साफल्यता झाली असे वाटले. नंतर सायंकाळी याच ठिकाणी आरती वगैरे करून रा. रा. साठे यांचे वाड्यात अदमासे ४० × ५० इंच साईजचा फोटो असेल, नक्की जाणव नाही, परंतु मोठा फोटो सदर श्री बाबा यांचा सदर वाड्यात ओसरीवर ठेवलेला असून त्याची पण दोन सांज पूजा आरती करण्याचा क्रम होता असे वाटते. कारण सकाळी ११/१२ चे सुमारास उतरल्यामुळे प्रथमच सायंकाळचा प्रोग्राम दृश्यमान झाला. त्यावेळी कोणत्याही तत्त्वात एकाग्रता करण्याची या देहास सवय असल्यामुळे आरती सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंत श्री बाबांचे मुखकमलावर दृष्टी एकाग्र झाली. त्यावेळी मुखकमल न दिसता वस्त्राच्छादित असलेले शिरोभागाचे ठिकाणी नरसिंह स्वरूप दिसू लागले. त्याच नादात हा जीव रंजित होऊन भान न राहिल्यामुळे आरती समाप्त झाली तरी जागृती नाही. सदर गाडगीळ यांनी हलवून सांगितले जोशीबुवा आरती झाली चला; म्हटल्यावर देहभानावर येऊन चाललो. परंतु एकाग्र दृष्टी झालेली छाया अदृष्ट होईना व पुनः पुनः हे काय आहे हे जाणण्याविषयी मन आतूर झाले. याप्रमाणे सांज-सकाळ तीन दिवस अनुभव आल्यावर सदरचे रा. रा. गाडगीळ अण्णासाहेब याना विचारता ते म्हणाले, 'बाबा असाच गंमती करतात. या जगाच्च पहाव्या म्हणजे झाले.' या जिवाची पूर्वीपार जगात निरपेक्षबुद्धि व निर्व्याज प्रेम ठेवून प्रत्येक चला-चल वस्तूमात्रात जग निर्माणकर्त्या आदिनारायणाचे वास्तव्य कसे आहे व सव्यापसव्य अंतर्बाह्य दृश्यादृश्य राहून कसे कसे पार्ट करून आपल्या करमणुकी करून घेत आहे; हे पहाण्यात हा जीव निरंतर गुंतून गेल्यामुळेच याचे नाव अपेक्षा या दोनही शब्दास कायमचाच फाटा मिळाला आहे. नंतर राहिलेले कर्तव्य देहप्राक्तन यांची वाट पाहून आलेले सुखदुःखाचे विवेचन न करता श्री नारायणचरणी सर्व कृत्ये व त्यांची फलश्रुती अर्पण करून मनास मुक्त ठेवावयाचे असा कार्यक्रम असून त्याच्या दृढाभ्यासाने हा देह परमेश्वर स्वरूपी जगाचा आमरणपर्यंत कायमचा दास झाला यातच या जीवास आनंद वाटतो, नव्हे परमानंदात मग्न आहे. परंतु सर्व कामिक जनाविरुद्ध ही गोष्ट असल्यामुळे या जिवाने रा. बा. साठे यांचेकडे जाण्याची परवानगी मागितली असता 'बाबांची परवानगी घेतल्याशिवाय जाणे होणार नाही' म्हणाले व दुसरे सेवेकरी म्हणाले, 'अहो, बाबांकडे काही मागा.' परंतु या जिवाची दर्शनाशिवाय काहीच इच्छा नसल्यामुळे मला काही मागावयाचे नाही. फक्त दर्शनाची फार दिवसांची इच्छा परिपूर्ण झाल्यामुळे परमानंद झाला व देहाचे साफल्य झाले म्हणालो. तरी विशेष आग्रहावरून या जिवाने त्यांनाच प्रार्थना करण्यास म्हटले की, श्री सत्यनारायण कंपनी दुकानावर या जिवाचा उदरनिर्वाह चालला आहे तोच चालण्याचा आशीर्वाद मागा म्हटल्यावरून त्यांनी सर्व मंडळीसमक्ष दोन प्रहरी दोनचे सुमारास या जिवाची मागणी रा. रा. गाड-गीळ यांचे पाहुणे या नात्याने श्री बाबांचे पुढे मांडली. नंतर कंपनी नाव न काढता धंद्याची उपलब्धी करून सदर सेवेकरी गृहस्थांनी प्रार्थना केली असता श्री बाबा म्हणाले "यांना नारायणानी चटणी भाकरीस काही कमी केले आहे काय" त्यांना

बेचारा व त्यांची इच्छा नसता तुम्ही बळजबरी का करता" असे म्हणताच मंडळी आश्चर्यचकीत झाली.

नंतर या देहास जाण्याची परवानगी मागण्यात आली, त्यावेळी म्हणाले, अशा प्रकारच्या निरपेक्ष जिवाना येण्याच्या व जाण्याच्या परवानगीची जरूरी नाही. त्यांनी वाटेल त्या वेळी यावे व वाटेल त्या वेळी जावे. सदर वेळी गुरुवार तेथे पडला त्या वेळी दोन प्रहरी रा. रा. गाडगीळ म्हणाले 'जोशीबुवा, येथला प्रसाद काही बरोबर न्यावा' म्हणून पुजारी जोग यांचेकडे प्रसाद मागण्यास गेलो.

त्या वेळी प्रत्येकास एक बर्फीचा तुकडा याप्रमाणे तीन इसमास तीन तुकडे या देहाच्या हाती पडले. मुक्कामाचे जागी गाडगीळ अण्णासाहेब वगैरे मंडळी समोर तुकड्यासह आल्यावर तेच म्हणाले 'एवढा प्रसाद पुरणार नाही, आणखी आठ आणे घेऊन जा व बर्फी घेऊन या.' शिर्डीतील सर्व प्रसाद बाबांचा आहे म्हणून निघालो असता वाटेतच एक इसम बर्फीचे ताट भरून श्रीबाबांनी गाडगीळ यांचे पाहुण्यास नेऊन देण्यास सांगितलेला याची गाठ पडून त्यानी परतविले व हा देह परत फिरला. सदर गाडगीळ व हा देह यांना आश्चर्य वाटून इकडील वृत्तांत अल्पावधीत त्यांना कसा कळला व तात्बडतोब त्यांनी योजना नेमकीच कशी केली याबद्दल आनंदाश्रू निघाल्यावाचून राहिले नाहीत. नंतर बाजारचा दिवस असल्यामुळे ओल्या भुईमुग शेंगा थोड्या नमुन्यादाखल पासरी सुमार आलेल्या मंडळीने चट्ट केल्यामुळे रा. रा. गाडगीळ यांनी एक रुपया देऊन आणखी शेंगा आणण्यास मनुष्य पाठविला. त्याला रा. ब. तात्यासाहेब यांनी अटक करून विचारले की, कोठे जातोस? त्याने 'शेंगा गाडगीळाचे पाहुण्यास आणण्यास चाललो' म्हणताच ते म्हणाले की, श्रीबाबांची आज्ञा झाली आहे की प्रथम आलेल्या दोन पोती शेंगा, पैकी सुमार अर्धा मण म्हणजे दोन टोपल्या शेंगा गाडगीळ व त्यांचे पाहुणे यांना खाण्याकरिता द्या नंतर ते नेण्यास मागतील तितक्या देऊन बाकीच्या इतर गोरगरिबांस वाटून टाका असे म्हटल्यावरून तोच मनुष्य शेंगा व रुपयासह परत आला. हे पाहून मंडळीस आनंदाचा उमाळा आला व श्री बाबा बसून काय काय खेळ करतात व त्यांचे सर्वांतर्यामी कसे वास्तव्य आहे याचे चांगलेच दिग्दर्शन होऊन सर्व मंडळीचे नेत्रांत आनंदाश्रू आल्याविना राहिले नाहीत. या स्मरणाने व त्यांचा फोटो या जिवाचे नित्य गीतापाठाचे प्रथम पृष्ठात ठेवल्यामुळे नित्य दर्शनाचा योग घडतो हे या जिवाचे परमभाग्य समजावयाचे अशा थाटात व आनंदात हा देह परत सोलापुरी आल्यावर परमभक्त श्रद्धाभिलाषी जीव व्ही. एस. फोटोग्राफर फारच भावीक व विश्वासू इतका की त्यांचे देहाचे या प्रेमात अखेर देहावसान झाले, परंतु प्रेम व श्रद्धा सुटली नाही. अशा भाविक जिवास या देहाने श्री बाबांचे दर्शनास जाण्यास सल्ला दिला व मागील खर्चाची रुपये दहाची भिक्षा दिली व सांगितले की रुपये दहा गेले तर जाऊं दे परंतु एकवार दर्शन करून ये व जमल्यास फोटोचे कार्य करून ये म्हणताच तावडतोब जाण्याची तयारी करून

सदर भाविक जीव तेथे या देहाचे पत्रासह दाखल झाला. नंतर तेथील रा. ब. साठे व गाडगीळ या मंडळींनी या इसमाची उत्तम व्यवस्था करून श्री बाबांचे दर्शन करविले. नंतर त्यांचा जुलमाने चुकवून घेतलेला पूर्वीचा फोटोग्राफ होताच परंतु या इसमाचे दर्शन झाल्यावर श्री बाबा आपण होऊनच म्हणाले " अरे तुला सत्यनारायण कंपनीचे जोशीबुवांनी फोटो घेण्यास पाठविले आहेना, मग बसलास का, तुला कसला पाहिजे तसा फोटो घे. " म्हणून श्रीबाबांनी संतोषाने व आनंदाने बसल्याचा व उभ्याचा असे फोटो काढू दिल्याबद्दल सर्व मंडळीस मोठे नवल वाटले. फोटो काढून झाल्यावर चार दिवस त्याला ठेवून घेऊन श्रीबाबांनी उपदेश केला की तू फोटोची किंमत वाजवीपेक्षा जास्त घेऊ नको; बाकी; तू सत्यनारायण कंपनीच्या जोशीबुवांचा पट्टशिष्य आहेस. ते तुला किंमत कधीही घेऊ देणार नाहीत व त्याचेच आशिर्वादाने तुझे कल्याण होणार आहे, म्हणून तेथे निघालेल्या दक्षिणाभिक्षा संस्थेमध्ये सदर फोटोग्राफरचे नाव रजिस्टर करून त्याला काही फोटोची आर्डर पण देण्यात आली व जाण्यायेण्याचे खर्चीसुद्धा रक्कम देऊन श्रीबाबांचे परवानगीने फोटोग्राफरची रवानगी करण्यात आली, त्याप्रमाणे त्या संस्थेस फोटो रवाना योग्य दराने करण्यात आले.

# युगावतार श्री साईबाबा–१

अनुवादक : श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅनशन, ताडदेव रोड, मुं. ७

( श्री साईबाबांनी भक्तकल्याणार्थ घडवून आणलेले चमत्कार व साक्षात्कार हे सर्वव्यापी असून स्थल–कालातीत आहेत. गुजरात राज्यातील व विशेषतः सुरत ह्या शहरातील भक्तांच्या प्रत्ययास आलेले उत्कट अनुभव ' श्री साईबाबा सत्संग मंडळ, सुरत ' ह्या संस्थेने " युगावतार श्री साईबाबा " ह्या गुजराती भाषेतील ग्रंथात संग्रहित केले आहेत. सदर संस्थेच्या परवानगीने हे सुरस अनुभव आम्ही श्री साई-लीलेच्या मराठी वाचकांसाठी चालू महिन्याच्या अंकापासून क्रमशः प्रकाशित करीत आहोत. आमच्या वाचकांना ते उद्‌बोधक वाटतील अशी आशा आहे.—सं. )

## टपाली बाबा

१९१८ साली श्रीसाईबाबांनी अवतार समाप्ति केली तोपर्यंत एखादा सन्मान्य अपवाद वगळता त्यांचे नाव गुजरातेत तरी विशेषसे कोणाला माहित नव्हते. ते

भाग्य श्री. मेघा व बार्डोलीचे श्री. वामनभाई पटेल उर्फ साई शरणानंद ह्यांच्यासारख्या पुण्यवान पुरुषांनाच लाभले होते.

१९३२ मध्ये श्री उपासनी महाराज गुजरात येथे गेल्यानंतर श्रीबाबांच्या कीर्तीचा लौकिक तेथे थोड्याफार प्रमाणात पसरला. श्री बाबांचे नेहमी हे सांगणे असे की, "ज्याचा माझा पूर्वजन्मीचा ऋणानुबंध असेल त्यालाच, तो जेथे असेल तेथून मी माझ्याजवळ खेचून आणिन," सुरत ह्या शहराचा सुद्धा श्रीबाबांशी काही ऋणानुबंध असावा. २८ जुलै १९५५ ह्या दिवशी सुरत येथे श्री साईबाबा सत्संग मंडळ हे एक भजनमंडळ अस्तित्वात आले. १९५७ साली ह्या मंडळाने रामयज्ञ केला, त्याशिवाय यमुनाबाग ह्या ठिकाणी श्रीमद्‌भागवतसप्ताह पार पाडला. दोन वर्षांनी ह्या मंडळाने श्री बाबांचे मंदिर बांधण्यासाठी जमीनही खरीदली.

सदर मंदिरात स्थापन करावयाची श्री बाबांची मूर्ति बडोदे येथील एका मूर्तिकाराने घडविली होती. मूर्ति आणण्यासाठी ९ मार्च १९६१ रोजी सुरतहून तिघेजण बडोदा येथे रवाना झाले. मूर्ति सुखरुपपणे आणावयास ट्रॉलीची आवश्यकता होती. पण तो फाल्गुन महिना असल्याकारणाने उद्योगधंद्याच्या दृष्टीने तेजीचे दिवस होते. भाड्याने ट्रॉली मिळणे एकंदरीत कठीण होऊन बसले. हो ना करता करता एका कंपनीने ट्रॉली देण्याचे मान्य केले. पण अडचण अशी होती की सदर कंपनीच्या ड्रायव्हरला फक्त बडोदे ते भडोच एथपर्यंतचाच रस्ता माहीत होता. भडोच ते सुरत हा रस्ता त्याला अपरिचित असल्याकारणाने सर्वश्री ठाकोरभाई पानवाला, बी. एस. लाल व छबिलदास मिठाईवाला ह्या त्रयीने सर्व भार श्रीबाबांवर टाकून मूर्ति घेऊन बडोदा ते भडोच हा प्रवास करण्याचे ठरविले. आधी योजल्याप्रमाणे रात्री बाराच्या मुहूर्तावर वरील मंडळींनी ट्रॉलीसह बडोदा शहर सोडले व दोन वाजता भडोच गाठले. ह्या पुढील प्रवासाचा यक्षप्रश्न उभा राहिला.

अंकलेश्वर मार्गे सुरतला जाण्याचे दोन रस्ते होते. त्यापैकी एक राष्ट्रीय हमरस्ता होता पण त्यामध्ये खाचखळगे इतके होते की श्री बाबांची मूर्ति त्या मार्गाने संभाळून नेणे जरा कठीणच होते. दुसरा रस्ता ओलपाड मार्गे सुरतकडे जाणारा होता. तो त्यातल्या त्यात बऱ्यापैकी होता, पण त्याला वेडीवाकडी वळणे फार! ह्या दोन्ही मार्गांपैकी एकाचीही या तिघांना तोंडओळखसुद्धा नव्हती. मंडळी जरा विचारात पडली होती, इतक्यात पोस्टमनचा पोशाख केलेला एक गृहस्थ अचानक तेथे आला. एवढ्या रात्री पोस्टमनला पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. पण तितक्यात त्याने आपणहूनच खुलासा केला, "तुम्ही सुरतला निघाला आहात ना? मग मीही तुमच्याबरोबर येतो. मी पोस्टमन आहे, पण माझी गाडी चुकली म्हणून मला उशीर झाला. मी येथेच जवळ रहातो." सुरतच्या मंडळींनी त्यावर म्हटले, "आम्ही सुरतला जात आहोत

अगदी बरोबर ओळखलेत. परंतु येथून पुढील रस्ता आम्हाला माहीत नसल्याकारणाने आम्ही या जागीच अडकून पडलो आहोत." लगेच पोस्टमन म्हणाला, "तुम्ही काही काळजी करू नका. मी ड्रायव्हरच्या बाजूला बसतो व त्याला चांगला रस्ता दाखवितो."

सांगितल्याप्रमाणे तो पोस्टमन ड्रायव्हरच्या बाजूच्या सीटवर बसला व त्याच्या मार्गदर्शनानुसार श्रीबाबांची मूर्ति अंकलेश्वर मुक्कामी येऊन पोहोचली. नंतर त्या पोस्टमनने दाखवल्याप्रमाणे ड्रायव्हरने ट्रॉली ओलपाडच्या रस्त्याला वळवली व त्या भयाण अंधारातून ट्रॉली पुढे मार्ग काढत चालली. तितक्यात एका निर्जन ठिकाणी त्या पोस्टमनने ड्रायव्हरला ट्रॉली थांबविण्यास सांगितले व दरवाजा उघडून तो खाली उतरला. फार अंतरावर मिणमिणत्या एका दिव्याकडे बोट दाखवून तो पोस्टमन म्हणाला, "त्या ठिकाणी मी रहातो. आता तुम्ही असेच पुढे गेलात की तुम्हाला एक सरळ रस्ता लागेल. त्या ठिकाणी डावीकडे वळा व तसेच सरळ पुढे गेल्यानंतर तुम्हाला वाटेत एक खोल खड्डा दिसेल. तेथे गाडी सांभाळून चालवा व दुसरा रस्ता फुटेल त्या मार्गाने गेल्यानंतर तापी नदीच्या पुलावर तुम्ही पोहोचाल."

एवढे बोलून तो पोस्टमन वाट चालू लागला. ट्रॉलीत बसलेल्या इसमांना अतिशय दूर क्षितिजावर एक लुकलुकणारा दिवा दिसला खरा, परंतु एवढ्या रात्री हा पोस्टमन एकाएकी आला कोठून? त्याची ट्रेन कशी काय चुकली? या घोर निबिड जंगलात ती ट्रेन कोठे येणार होती? आणि ही मंडळी सुरतला जाणार होती ते त्याला कसे समजले? या प्रश्नांचा मात्र समाधानकारक उलगडा त्यांना झाला नाही.

१० मार्च १९६१ रोजी श्री बाबांची मूर्ति सुरत शहराच्या हद्दीत आधी ठरल्याप्रमाणे बरोबर पहाटे पाच वाजता आली तेव्हा महापालिकेच्या इमारतीच्या मनोऱ्यातून पाच घंटानाद झाले.

वाट चुकलेल्यांना मार्गावर आणणे हे श्री बाबांचे जीवनकार्यच होते. भवसागरात गटांगळ्या खाणाऱ्या आपणासारख्या मानवी प्राण्यांनी त्यांना पूर्णपणे शरण जाण्यातच आपले कल्याण आहे. हे काय सांगावयास पाहिजे?

# तुमचे श्रीसाईबाबांविषयींचे सामान्य ज्ञान किती आहे?

( पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व देता आल्यास उत्कृष्ट समजावे. )

( १ ) श्रीसाईबाबांचे शिरडी हे क्षेत्र......नदीच्या तीरावर आहे.
( अ ) शरावती, ( ब ) भोगावती, ( क ) गोदावरी, ( ड ) वारणा

( २ ) श्रीसाईबाबांना ' साई ' हे नाव प्रथमतः शिर्डीच्या......देवळात पडले.
( अ ) विठोबाच्या, ( ब ) खंडोबाच्या, ( क ) विष्णूच्या, ( ड ) मारुतीच्या

( ३ ) श्रीसाईबाबा हे......साक्षात अवतार समजले जातात.
( अ ) नागाचा, ( ब ) बळीराजाचा, ( क ) दत्ताचा, ( ड ) विष्णूचा

( ४ ) श्रीसाईबाबांचा शिरडी समाधी मंदिरातला भव्य पुतळा श्री......या प्रख्यात शिल्पकाराने तयार केलेला आहे.
( अ ) आचरेकर, ( ब ) यावलकर, ( क ) घोरपडे, ( ड ) तालीम

( ५ ) नागपूरचे श्री......बाबा हे साईंचे समकालीन होत.
( अ ) ताजुद्दीन, ( ब ) मेहेर, ( क ) गुलाब, ( ड ) कमू

( ६ ) बाबांच्या प्रेमळ व आज्ञाधारक घोड्याचे नाव होते.......
( अ ) शामसुंदर, ( ब ) मनमोहन, ( क ) तारा बल, ( ड ) इंदार जेट

( ७ ) श्रीसाईबाबांनी......देहत्याग केला—
( अ ) गुढीपाडव्यास, ( ब ) गुरुपौर्णिमेस, ( क ) विजयादशमीस ( ड ) गुरुद्वादशीस

( ८ ) बाबांच्या निकटवर्ती भक्ताचे नाव होते—
( अ ) शाम्या, ( ब ) राम्या, ( क ) बन्या, ( ड ) मोहन्या.

( ९ ) श्रीसाईबाबांचे ओवीबद्ध चरित्र......यांनी प्रथम लिहिले.
( अ ) मोरोपंत ( ब ) हेमाडपंत, ( क ) दासोपंत, ( ड ) नरसोपंत.

( १० ) श्रीबाबांची जागृत समाधी पहावयाची असेल तर तुम्हास......येथेच जावयास हवे.
( अ ) शिरडी, ( ब ) पारडी, ( क ) कालडी, ( ड ) भिवंडी

—सदानंद चेंदवणकर

### उत्तरे

( १ ) – क, ( २ ) – ब, ( ३ ) – क, ( ४ ) – ड, ( ५ ) – अ, ( ६ ) –अ
( ७ ) – क, ( ८ ) – अ, ( ९ ) – ब, ( १० ) – अ.

# प्रत्यक्ष श्री साई दर्शन

● दशरथ रामजी तळेकर
मुकेश मिल कंपाऊंड, व्हिक्टोरिया बंदर रोड,
चा. नं. पी. रूम नं. ६, कुलाबा मुं. ५

११ ऑगस्ट १९७५ चा दिवस. वार गुरुवार होता. मी व माझे सज्जन मित्र वसंत बाने असे आम्ही दोघे मिळून शिरडी येथे 'साईबाबांच्या दर्शनासाठी' गेलो होतो. बरेच दिवस मनात राहून गेलेली 'बाबांच्या दर्शनाची आस' बाबांची सगुण मूर्ति पाहिल्याबरोबर दूर पळाली आणि माझ्या शरीरात एक नवीन उमेद आल्यासारखी मला भासू लागली. बाबांच्या मूर्तिपुढे एकाग्र चित्ताने उभा राहून मनोभावाने मी दर्शन घेतले आणि देवळातील समोरच्या कोपऱ्यात बाबांकडे तोंड करून बसलो.

—आणि एकाग्र चित्त करून अंतर्मुख होऊन मनांत साईनामाचा जप सुरू केला आणि काय चमत्कार ! साईंची सगुण मूर्ति माझ्या समोर उभी ठाकली. मी विनम्रभावे वंदन करून बाबांना म्हणालो, "बाबा, इतके शेकडो, हजारो भक्त तुमच्या दर्शनाला येत असतात, अनन्य भावाने प्रार्थना करतात आणि तरी मग तुम्ही अशा अनन्य भक्तांची उपेक्षा का करता ? त्यांना दुःख, संकटे भोगावयास का लावता ?" बाबांनी माझ्याकडे पाहून स्मित हास्य केले व म्हणाले, "बेटा, अरे इथे माझ्या मंदिरात येणारे हे सर्वजण माझे अनन्य भक्त आहेत असेच तू समजतोस काय ? ही तुझी समजूत चुकीची आहे. सर्वजण काही ना काही गाऱ्हाणे घेऊन व त्यातून सुटका व्हावी म्हणून आलेले आहेत. फक्त संकटकाली माझे स्मरण करणारे ! पहायची आहे गंमत ? प्रत्येकाच्या हृदयातले भाव समजण्यासाठी त्यांच्या अंतर्मनात शिरण्याची शक्ती मी तुला देतो."

असे म्हणून त्यांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला आणि मी पाहू लागलो तर खरोखर प्रथम एक गृहस्थ बाबांच्या मूर्तिपुढे उभे राहून हात जोडून प्रार्थना करीत असल्याचे दिसले. तो म्हणत होता, 'देवा ! साईनाथा ! माझं एक छोटसं किराणा मालाचं दुकान आहे. त्याच्यापासून मला फायदा म्हणून काही नाही. मी रोज जेवढा माल विकत आणतो तो सगळा संपतो. पण खरेदी केलेल्या मालाचे पैसे पण मला मिळत

नाहीत. दुकान असून माझ्यावर इतरांचे कर्ज झाले आहे. तर माझ्या दुकानापासून मला खूप फायदा मिळू दे. मग मी तुला चांदीच्या पादुका अर्पण करीन.'

तो गृहस्थ जातो न जातो तोच एक कॉलेज कुमार मंदिरात येऊन हात जोडून म्हणून लागला, ' साईनाथा ! संपूर्ण वर्ष मी चैनीत, सिनेमा बघण्यात, विनाकारण भटकण्यात घालविले. मन लावून अभ्यास असा कधीच केला नाही. कॉलेजमध्ये नेहमी गेलो पण लक्ष मात्र सिनेमाकडे. घरी वडिलांच्या समोर पुस्तक घेऊन बसलो तरी सर्व आठवणी सिनेमाच्याच. आता परीक्षा एकदम जवळ येऊन ठेपली आहे. तेव्हा देवा काही करून मला परीक्षेत यश येऊ दे. मग मी तुला एक किलो पेढे नैवेद्य म्हणून अर्पण करीन.'

कॉलेज कुमार जातो न जातो तोच एक गृहस्थ हात जोडून म्हणत होते, 'देवा साईनाथा ! आजपर्यंत मी पुष्कळ चोऱ्या केल्या. परंतु त्या छोट्या मिळकतीच्या. आता मात्र खूप मोठ्या मिळकतीची चोरी करायची आहे. तर माझा आज रात्रीचा दरोडा यशस्वी होऊ दे. मग मी तुला सोन्याचा हार घालीन.'

चोर जातो न जातो तोच एक बाई येऊन विनवित होती, ' देवा ! माझी एकुलती एक मुलगी दिसण्याला जरा इतरांपेक्षा कमीच आहे. त्यामुळे तिच्या लग्नाचं कुठेच जमत नाही. तिचं वय वाढत चाललं आहे. तेव्हा तिचं लग्न लवकर जमू दे ! मी तुला सुंदरसा पोषाख घालीन.'

बाई जाते न जाते तोच निवडणुकीला उभे राहिलेले एक गृहस्थ. ते म्हणू लागले, देवा ! मला मागच्या निवडणुकीत अपयश आले. परंतु तरी सुद्धा मी जिद्द न सोडता या येत्या निवडणुकीसाठी उभा राहिलो आहे. तर या निवडणुकीत मला निवडून येऊ दे. मी तुझ्या देवळाचा जिर्णोद्धार करीन.'

त्यांच्या पाठोपाठ एक पंचविशीतील तरूण आला. तो म्हणू लागला, 'देवा साईनाथा ! वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत नुसते शिक्षणच घेतले. कितीतरी शैक्षणिक पदव्या असून सुद्धा नोकरी कुठेच मिळत नाही. वडिलांच्या पैशावर मी कोठपर्यंत जगणार ? नोकरी नाही म्हणून आईवडील सुद्धा माझा राग करतात. बेकार म्हणून भाऊबहीण मनापासून बोलत नाहीत. म्हणून कधी कधी जीवनाचा अंत करावासा वाटतो. म्हणून साईनाथा ! ह्याच्यातून तूच आता मार्ग दाखव.'

त्याच्या पाठोपाठ एक वयोवृद्ध गृहस्थ येऊन प्रार्थना करीत होते, 'देवा ! माझ्या मुलाला मोठ्या कंपनीत नोकरी मिळणार आहे. त्या अगोदर दोन दिवसांनी त्याचा इंटरव्ह्यू ( परीक्षा ) घेणार आहेत. तर त्याला त्या परीक्षेत पास कर व एकदाची त्याला नोकरी मिळू दे ! त्याचा पहिला पगार मी तुझ्यासाठी खर्च करीन.'

याप्रमाणे देवळात येणाऱ्या भक्तजनांची सारखी रीघ लागली होती. असंख्य भक्त येऊन विनवित होते व काही ना काही मागणे मागत होते. हे सर्व पाहून मी बाबांना म्हणालो, " बाबा! तुम्ही म्हणालेत तेच खरे. उगाच मी तुम्हाला बोल लावला. मला माफ करा. तुमची अनन्य भक्ती करणारा हजारोत सुद्धा एक सापडेल की नाही हे तुमचे तुम्हालाच माहीत. "

— तेव्हा बाबा म्हणाले, " माझी अनन्य भावाने भक्ती करणारांची मी कधीच उपेक्षा करीत नाही. त्यांनी मला न सांगता मी त्यांची कामे करून देतो. तेव्हा मी तुला प्रथम सांगितले ते खरे आहे ना! पटली ना खात्री?"

असे म्हणून बाबांची सगुण मूर्ति माझ्या डोळयापुढून अंतर्धान पावली व मी झोपेतून जागा व्हावे तसा जागा होऊन व बाबांना विनम्र भावे वंदन करून, मनात साईनामाचा जप करीत मुंबईस यायला परतलो. परतीचा आमचा दोघांचा प्रवास ' साईकृपेने ' सुखकर झाला.

## बाबा काय करतात

प्रेषक : अनिल पंडित
१३, खातीपुरा रोड, इन्दूर ( म. प्र.)

मेडिकल एनसाइक्लोपीडीया ( MEDICAL ENCYCLOPEDIA ) मधे जितक्या रोगांची वर्णने दिली आहेत ते सर्व रोग अस्तित्वात आहेत. तो रोग कोणाही व्यक्तीस होऊ शकतो. पूर्व जन्माच्या कर्मानुसार कोणास कॅन्सर होतो तर कुणा व्यक्तीच्या आयुष्यात साधारण फ्लू पण शिवत नाही.

त्याचप्रमाणे जीवनाच्या एनसाइक्लोपीडीया ( LIFE ENCYCLOPEDIA ) मधे सुख व दुःख अस्तित्वात आहे. कुणाच्या वाटेस सुख येते तर कुणाच्या दुःख. कोणाही व्यक्तीच्या सुखाचा हेवा करू नये, तसेच दुःखास घाबरुन जाऊ नये. सुख व दुःख ही तर कोणाला तरी मिळणारच. पण रात्र नंतर पहाट होतेच, चढावानंतर उतार येतोच. नाण्याला देखील दोन बाजू असतात.

खरा मनुष्य तो जो दुसऱ्याचे दुःख पाहून वितळतो, त्याचे हृदय द्रवते, डोळ्यात अश्रु उभे रहातात, कंठ दाटून येतो. सुखात सर्वच जण जवळ येतात पण दुःखात कोणी येत नाही.

बाबांचा भक्तांना उपदेश म्हणजे खरी गीताच. बाबांनी सांगितलेल्या गोष्टी अमलात आणणे म्हणजेच बाबांची खरी भक्ति करणे आहे. बाबांनी खरा जोर श्रद्धा व सबुरीवर दिला आहे. ज्या व्यक्तीस सबुरी (PATIENCE) नाही त्याचे कोण-तेहि काम होत नाही. चांगले काम यशस्वी होण्यास वेळ हा लागेलच. ज्या झाडाचे पान बाबांच्या आज्ञेवाचून हालत नाही, तेव्हा इतर कामात घाई गर्दी करण्यात काय अर्थ.

बाबांच्या श्रीसाईसच्चरित्राचे वाचन केल्याने मनुष्याच्या जीवनात हळूहळू बदल घडून येतो. त्या व्यक्तीस आत्मज्ञानाचा अनुभव येतो. दुसऱ्या प्राणीमात्रावर दया उत्पन्न होते व त्या व्यक्तिस सर्व वस्तुत आत्मा दिसतो.

प्रत्येक व्यक्तीस मग तो मनुष्य असो किंवा प्राणी ह्या जगात जगण्याचा अधिकार आहे. मारणारे आपण कोण. जसे कर्म कराल ह्याच जन्मी त्याचे फळ मिळते. तेव्हा बाबांना शरण जाऊन त्यांची दररोज भक्ति करण्यातच आमच्या जीवनाचे कल्याण होऊ शकते. जीवनाचा मार्ग सुलभ होऊन जीवन आनंदीत होण्यास मदत होते. बाबा म्हणतात "बनता बनता बनेल" ह्या शब्दात फार मोठा अर्थ आहे. माणसाने धैर्य, सबुरी व प्रयत्न ठेवला तर त्या व्यवसायात त्या व्यक्तीस यश हे येणारच. बाबा त्या व्यक्तीस आपल्या शक्तीने त्याच्या व्यवसायात प्रविण करितात व त्या व्यक्तीस आपल्या जीवनात, वागण्यात, बोलण्यात फरक झालेला आढळून येतो. ही सर्व परिवर्तने बाबांची सेवा केल्याने प्रत्ययास येतात. आयुष्यात फार लांब जाण्याची जरुर नाही. बाबा आमच्या जवळच आहेत.

बाबा एखाद्या व्यक्तीस आपल्या जवळ आणतात, त्या व्यक्तीने बाबास कधी पाहिलेले नसते, पण बाबा त्याच्या भक्तीची योग्यता ओळखतात. त्याच्यात भक्तीचे बीज असते, बाबांच्या कृपेने त्याचे अंकुर होऊन भक्तीचे एक मोठे वृक्ष त्याच्या जिवनात निर्माण होते, त्या भक्तास ह्याची जाणीव नसते पण बाबा त्या व्यक्तीस दोराप्रमाणे खेचून आणतात व त्याच्या जन्माचे कल्याण करितात.

अशा ह्या बाबास माझा शतशः प्रणाम !

# माणसाचं मन

● विनायक पाठक
बी, १७–२३४, राजावाडी
घाटकोपर, मुंबई

संतश्रेष्ठ समर्थ रामदासांनी एकदा मनाला प्रश्न विचारला, " बा, मना ! भक्ति पंथेचि जाया तूं सज्ज आहेस ना ?" भक्तिपंथाचा मार्ग आपल्या आवाक्याबाहेरचा आहे असे वाटून म्हणा, किंवा भक्तिपंथाने जाण्याची त्याची उदासीनता पाहून म्हणा माणसाचं मन अवाक् होऊन भांबावल्यागत झाले. मन अनुत्तरीत झाल्याचे वा त्या प्रश्नामुळे जरासे अवघडल्यागत झालेसे पाहूनच पुढे सुभाषितकारांनी म्हटले असावे, " मन हे ओढाळ गुरू । परधन परकामिनी सवे धावे । यास्तव विवेकपाशे । कंठी वैराग्यसूत्र बांधावे ॥ "

मनुष्य जन्मात मनाची श्रेष्ठता लक्षात घेऊनच की काय समर्थांनी " मनाच्या श्लोका" चा प्रपंच केला असावा. " मन चंगा तो गोद में गंगा " या हिंदी वाक्प्रचारातही मनाचा निर्विवाद मोठेपणा वर्णिला आहे.

राष्ट्रकार्यासारखे कोणतेही उदात्त कार्य नेहमी तनमनधनपूर्वक करावे असे सांगण्यात येते. या आदेशातही माणसाच्या मनाचीच महत्ता अभिप्रेत आहे.

योगाभ्यासात तर माणसाच्या मनाचीच एकाग्रता प्रथम आवश्यक असते. म्हणजे मन सर्व इंद्रियांचा राजा. अव्यक्त असूनही सर्व शरीरावर सत्ता गाजविण्याची असीम क्षमता हीच माणसाच्या मनाची विशेषता आहे. " मन जिंकी, तो जग जिंकी " ही मनाची श्रेष्ठता आहे.

मनोबल, मनोनिग्रह, मनोहर, मनमुराद, मनमाना, मनकवडा, मनोरथ आदि शब्दांतून माणसाच्या मनाच्या विस्तृत कक्षा व विस्तारच ध्वनित होतो. " मन चिंती ते वैरी न चिंती " या म्हणीत तर माणसाच्या मनाच्या सूक्ष्म व अमर्याद चिंतनाची व कल्पनाशक्तीची परिसीमाच सूचित केली आहे. कल्पना करणे हा माणसाच्या मनाचा धर्म आहे. मनाची भरारी सूर्यमंडळ भेदण्यापर्यंत व पाताळाची पाठ पुरविण्यापर्यंत जाऊ शकते. आणि म्हणूनच सर्व संतश्रेष्ठ सांगून गेले की मन ताब्यात ठेवा म्हणजे विश्वातील सर्व सिध्दी तुमच्या समोर हात जोडून उभ्या राहतील.

केवळ कल्पनांच्या मनोराज्यात रमून कर्तृत्वाचा विसर पडलेल्या माणसाला " मनातले मांडे मनातच खावे लागतात " व पुष्कळ वेळा अशा माणसांची मने विकृत होऊन ती माणसे मनोरुग्ण बनत असतात.

जप महात्म्यात मनाने जप करण्याचे महत्त्व वर्णिले आहे – आपण मनाने करीत असलेला जप हा आपल्या " मनाचा शब्द " असतो असे म्हटले आहे.

अध्यात्मात ' मी ' हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. पहिला ' मन ' या अर्थी व दुसरा सर्वेश–सर्वव्यापी या अर्थी ! मनाचे स्थूल मन व सूक्ष्म मन असे दोन प्रकार वर्णिले आहेत. तसेच सु-मन व कु-मन हेही दोन प्रकार मनाच्या गुणवत्तेच्या निकषावर सांगितले आहेत. स्थूल मनाच्या शरीरात अहंकार भरलेला असतो व मनाच्या निग्रहानेच तो शूल काढायचा असतो. वास्तव मनाला शुभ चिंतनाची सवय लावून घेणे हेच आपले प्राप्त कर्तव्य ठरते. अंतरंगातील मन " सोऽहं " रूपाने रंगले म्हणजे माणसाचे मनच आनंदरूप होते.

" अभ्यासेन तु कौंतेय दुर्निग्रहं चलं मनः गृह्यते " या भगवंताच्या उक्तीप्रमाणे अभ्यासानेच मन ताळ्यावर आणता येते – एकाग्र करता येते. व एकदा माणसाचे मन संकल्प-विकल्पांच्या, तर्क–कुतर्कांच्या जंजाळातून सुटले की,

" मन हे निश्चल झाले एके ठायी
तया उणे नाही काही निजसुखा ॥ "

# उदीमाईचा महिमा

— सौ. ललितागौरी कवली
२२५ सरस्वती निलयम, ५ वा ब्लॉक,
राजाजी नगर, बंगलोर १०

श्री साईबाबांची उदी हे एक महान सत्य आहे. या उदीत भरलेले अनंत गुण, उदीतली पावित्र्यता, तिचा प्रभाव हा बुध्दीला आणि मनाला आकलन न होणारा, अनाकलनीय असा चमत्कार आहे. ते एक गूढ आहे. यावच्चंद्रो दिवाकरौ असं कधीही न उलगडणारं कोडं आहे.

या कलियुगात चंद्रावर पोचलेला मानव, पाश्चिमात्य संस्कृतीने अंतर्बाह्य पछाड-लेला, देव झूट आहे, अंगारा थोतांड आहे असं मानणारा पक्का नास्तिक आहे. (कुणी

सांगावे, त्याच्या पूर्वसुकृतानुसार साईचरणांचा लाभ त्याला झालाच तर हाच नास्तिक उदीमाईचे अखंड पोवाडे गावू लागेल.) हे मुळीच अशक्य नाहीय. फक्त त्याची वेळ यायला हवी.

उदी म्हणजे राख. पण त्या राखेतला आशय जितका गहन तितकाच परखड पण आहे.

मनुष्यदेह हा पंचमहाभुतांची काष्ठरूपी मोळी आहे. आपली कर्मे भोगभोगून ती चेतनाहीन झाली की त्याची होते चिमटीभर राख. माणसाला अत्यंत प्रिय असलेल्या देहाची होणारी ही अंतिम गति, तिचा विसर पडू नये म्हणून बाबा उदीप्रदान करीत असत.

जग हा मायेनं भरलेला पसारा आहे. इथे कुणी कुणाचे नाही. माणूस जसा जन्मतो तसाच जातो, याची खूण म्हणून बाबा उदी देत असत.

किंवा संसार हा एखाद्या उदीप्रमाणे आहे. मनुष्याने संसारात कमलपुष्पाप्रमाणे रहायला हवे. या नश्वर असणाऱ्या देहाचा अभिमान त्यजून, जग हे मिथ्या आहे, हे त्रिवार सत्य या उदीत सामावलेले आहे.

श्री समर्थ अत्यानंदाने आपल्या सुस्वर मधुर वाणीत नित्य गात असत :

" रमते राम आयोजी आयोजी ।
उदीयोकी गोनिया लायोजी लायोजी ॥ "

श्री समर्थ साईनाथ भक्तांकडून दक्षिणा घेत असत. त्यातली गोरगरीबांना वाटून जी उरेल त्यातून लाकडाच्या मोळया खरीदत आणि द्वारकामाईत नित्य धुमसणाऱ्या धुनीतल्या हुताशनीला अर्पण करीत. त्यातून निर्माण झालेली राख, ते भस्म म्हणजेच उदी प्रसादरूपाने भक्तांना अत्यंत संतोषपूर्वक देत असत.

शिरडीहून परतताना मशीदमाईत जाऊन श्री बाबांच्याकडून उदीयुक्त आशीर्वचन घेतल्याशिवाय कुठल्याही भक्ताला शिरडी सोडता येत नसे. एकदा का बाबांचा उदीयुक्त अमृतहस्त मस्तकावर स्थिरावला की कळीकाळालाही परतवून लावण्याचे सामर्थ्य त्या आशीर्वादात असे.

परंतु बाबांच्या अनुज्ञेवाचून शिरडी सोडली की वाटेत विघ्नांचे गिरीवर कोसळलेच, ही काळ्या दगडावरची रेघ ठरे.

अर्थात श्री साईबाबा आपली प्रचिती दाखवून शेवटी संकटाचं निवारण करीत. परंतु त्यावेळी भक्ताला दे माय धरणी ठाय होऊन जाई आणि बाबांचं आपण ऐकलं नाही म्हणून विलक्षण पश्चाताप होई. अर्थात परत आयुष्यात बाबांची अनुज्ञा व उदीमाईचा प्रसाद घेतल्यावाचून शिरडीच्या बाहेर त्याचा पाय नक्कीच पडत नसे.

ज्याप्रमाणे सूर्य उगवतो, चंद्र कलेकलेने वृध्दिंगत होतो, क्षय पावतो, तारे चमकतात, वारे वहातात, फुलं उमलतात हे जेवढं त्रिवार सत्य तेवढंच द्वारावतीतल्या धुनीमाईने प्रसवलेली उदी हेही तितकंच त्रिवार सत्य.

बाबा प्रसाद म्हणून उदी देत ती धुनीमाईतली. हवेत हात फिरवून उदी काढणे, फोटोतून उदी पाडणे अशासारखे जादूई चमत्कार बाबांनी केले नाहीत.

माझा कुठल्याही संतांवर टीका करण्याचा उद्देश नाही. कारण प्रत्येक संताचे भक्तांना भक्तिमार्गाला लावण्याचे मार्ग भिन्न भिन्न असतात.

केवळ बाबांच्या उदीमाईचा महिमा सिद्ध करण्याकरिता म्हणून मी हे उदाहरण दिले. अर्थात जे सिद्ध आहे त्याला काय सिद्ध करायचं म्हणा ? असा वेडेपणा करणं म्हणजे साक्षात् अग्नीची उष्णता पारखणं, हिमाची शितलतेबद्दल परीक्षा बघण्यासारखं आहे.

श्री समर्थ साईबाबा एक फार मोठे हकिम होते. प्रथम ते औषध देत. नंतर त्यांनी औषध देण्याचे सोडून उदी द्यायला सुरवात केली. मग तो कुठला का रोग असेना.

आणि त्या उदीचा प्रभाव इतका परिणामकारक होता की हाडयावर्णासारखे, नारुसारखे असाध्य रोग उदीच्या सामर्थ्याने पूर्ण कह्यात आले, साध्य झाले आहेत. या उदीमाईने अनेकांना रोगमुक्त केलंय, दुःखमुक्त केलंय.

नाशिकच्या एका भक्ताला विंचू चावला, कुणाजवळच उदी शिल्लक नव्हती. तेव्हा उदबत्तीची राख बाबांचे स्मरण करून दंश झालेल्या जागेवर चोळली. तावडतोब विंचू उतरला.

तेव्हा जोपर्यंत चंद्रसूर्य या पृथ्वीतलावर उगवणार, तोपर्यंत द्वारकामाईतलं अग्निहोत्र धुमसत रहाणार, व त्यातून निर्माण होणार उदीमाई– अगदी जगाच्या अंतापर्यंत.

या कलियुगात उदीमाईच्या रूपाने श्रींनी केवढी मोठी संजीवनी आमच्या हाती दिलीय ! केवढं महान वरदान आहे ते–दुःखमुक्त, रोगमुक्त होण्याचं.

फक्त आमची तशी श्रद्धा हवी, जाज्वल्य अशी निष्ठा हवी, अंतरी तसा भाव असावा.

नाहीतरी देव भावाचाच भुकेला नाही का ?

# मधु राजा–मधु राणी

लेखक — द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे

( एकनाथी भागवतातील कपोता–कपोती या आख्यानाचे आधुनिकरण )

आईवडील व एकुलता एक मुलगा असं ते एक कुटुंब होतं. मुलाचे नाव मधुकर. एकखणी चाळीत ते एका खणात राहात. वडिलांना पगार फारसा नव्हता; पण कमीही नव्हता. काटकसरीत सुखाने राहाता येईल एवढा. मधुकराच्या आधीची दोन मुले साधारण मोठी होऊन आईवडिलांना सोडून गेली. राहिला तो मधुकर. यामुळे आईवडिलांचा त्याच्यावर भारी जीव, लहान असल्यामुळे तोही आईवडिलांच्या आज्ञेत होता. बुद्धीने बऱ्यापैकी असल्यामुळे दर वर्षी बढती मिळत गेली. वय वाढलं यत्ता वाढली व त्याबरोबर महागाईही वाढत राहिली. मधुकर चौथ्या यत्तेत असताना वडिलांना पेन्शन बसली, मधुकर हायस्कुलात गेला. हायस्कूलच ते. तेथला खर्च हाय करायला लावणार, यामुळे पुष्कळ पालक हाय खात व त्यांच्या मुलांना शिक्षणास मुकावे लागे, काही आशावादी भविष्याच्या आशेवर मुलांना कसे पेन्शन कसेबसे शिकवीत. मधुकर ६ वीत गेला. खर्च वाढत राहिला, पेन्शन मात्र स्थिर राहिले. वय गेल्यावर मुलगी व नोकरी मिळविणे कठीण. मधुकरच्या वडिलाना नोकरी कोण देणार? यामुळे खर्च भागविण्यासाठी घरच्या खर्चाला कात्री लावणे भाग पडले. आर्थिक कात्रीत सापडलेला माणूस काटकसरीची कात्री लावण्याखेरीज दुसरं काय करणार? मधुकरच्या वडिलांनी खर्चाला कात्री लावली. कोणता? सरकारी धोरण त्यांनी स्वीकारले. शिक्षणाला त्यांनी कात्री लावली. आईवडिलांच्या खर्चात कपात नाही. वडिलांच्या विड्या व आईच्या वेण्या याना धक्का नाही. कात्रीने पहिली कपात केली ती मधूच्या शिक्षणाची. ६ वीत त्याने शाळा सोडली.

एक सोडलं तर दुसरं धरावे लागते. नाहीतर जीवनात तोल जातो, माणूस काहीतरी धरत असतो व धरलेले सोडीत असतो व नवीन धरतो. असा हा धरसोडीचा जीवनक्रम सर्वसाधारण माणसाच्या वाट्यास येतो. मधूने शाळा सोडली व नोकरी धरली. ती एका गिरणीत रोजीनदारीची. बिचाऱ्या मधूला यात काय विशेष कमाई होणार? महागाईमुळे पगार फुगलेला वाटे, घेताना मनाला बरे वाटे. पण घरी आल्यावर महागाईने फुगलेल्या या फुग्यातील हवा हातोहात निघून जाई व फुग्याची पिसपिसीत पिशवी हाती राही, मधूची कमाई व वडिलांचे पेन्शन यांच्या स्नेहामुळे त्यांचे कसेबसे भागे. दोन वेळची मिळवणी होई एवढेच.

मधुकर मोठा झाला. तरुण झाला. वयात आल्यावर जनराहटीप्रमाणे जे करावे लागते ते करण्याच्या खटपटी सुरू झाल्या. मधुच्या लग्नाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. ५ वीच्या सर्टीफिकिटाच्या वाट्याला असा काय मोठा वाटा येणार ! सून आली की म्हातारपणी तरी कामातून सुटका ही आईची आशा, मिळवती असली की तेवढाच भार हलका, ही वडिलांची अपेक्षा, घरात की बाहेर असा हा पेच. यामुळे आई-वडिलांत हळुहळू संघर्ष सुरू झाला. बाजारात तुरी असला प्रकार. मुलीचा पत्ता होता कुठे ? तोच तर वडिलांना मिळेना. पाच चोपड्याना मिळवती मुलगी मिळणे सोपे नाही. आजकाल गुणारूपापेक्षा पैशाकडे पाहून लग्न होतात. अशावेळी माणसाची किंमत उतरते यात नवल नाही. मधूच्या वडिलांची मिळविल्या मुलीसाठी धडपड. अर्थात मधूचे जमेना. पण म्हणतात ना जेथे दात आहेत तेथे दाणे आहेत. जेथे तरुण आहेत तेथे तरुणी आहेत. मधु राहत होता त्याच चाळीत दोन गाळे पलीकडे एक गरीब पण सालस कुटुंब राहात होते. मधुबाला चार चोपड्या झालेली. रूपाने बरी. मिळवती नव्हती शिवाय गरीबी. म्हणून रखडली. मधुबालाच्या वडिलानी मधुकरच्या वडिलाकडे सोई सोईने सोयरिकीची गोष्ट काढली. मुलगी कामाला चटपटीत, प्रकृतीने ठणठणीत, व्यवहाराला सणसणीत व बोलण्यात चतुर नि चुणचुणीत होती. शिवाय नेहमीच्या पहाण्यातील. आईला एकदम पसंत. मिळवती नाही हे वडिलांना खटकले, पण पुढे मिळवील असे समाधान मानून त्यांनी पसंती दिली. मधुकर ? तो तर रुपालाच भुलला. मधु बोलणाऱ्या मधुबालेशी, ती मिळवती नसली तरी मिळतं जुळतं घ्यायचं त्यानं ठरविलं. जमलं, बार भरला गेला व एका सुमुहूर्तावर उडाला. दोहोंचे चार हात झाले, भलं झालं. संसारात चार हात करायला त्यांची जरुरीच असते. मधुकर संसाराच्या पिंजऱ्यात अडकला, मधुकर आता मधुकरराव या पदवीला पावला.

संसाराच्या डावात राजाराणी आले की आईवडील गुलाम होतात. उंबरठ्यावरचे माप ओलांडून आलेली लक्ष्मी व २–३ वर्षानंतरची गृहलक्ष्मी यांच्यात महद् अंतर असते. लक्ष्मी घरात येते तेव्हा माप लवंडून. याचा मुळ अर्थ काहीही असला तरी, आज मी माप लवंडून आले, उद्या सगळीच मापे लवंडायची आहेत असा असावा, आपला आमचा कयास. रात्री येते ती नव्हे तर दोनतीन वर्षांनी दिसते ती खरी सून. सून रात्री सारखी घरात शिरते. रात्र कशी हळूहळू प्रकाशाला ग्रासते व मग सगळं जग अंधारात बुडवून टाकते तशी सुन हळूहळू नवऱ्याला ग्रासते व नंतर कुटुंबियाना अंधारात लोटते. मधुबालेने प्रेमाचा एक्का वापरला. मधुकरचा हात गेला. आई–मामंजींच्या तटबंदीला तडे पडले. घरातील आनंद व सुख बाहेर गेले व कुरकुर, भुरभुर, कागाळे व संघर्ष आत आले. मला वेगळं व्हायचय या नाटकाची नांदी मधुबालेकडून वारंवार होऊ लागली. बाह्य रूपावर लुब्ध झालेल्या मधुकरला बायकोने आपल्या मायाजालात पूर्ण गुरफटून टाकले. इतके दिवस आईवडीलांचा भक्त असलेला मधुकर विभक्त झाला. त्याने राजाराणीचा नवा संसार थाटला. मला वेगळं व्हायचयची भैरवी झाली. पण पुढे

करायला गेलो एकची नांदी सुरू होईल याची मायेच्या पांघरुणात गुरफटलेल्या मधुकरला काय कल्पना ?

आईवडिलांविषयीचे प्रेम, ममता अजूनही मधुकरच्या ठिकाणी होती. पण स्त्रीच्या प्रेमाच्या पांघरुणाखाली ती झाकली होती. सोनं उकिरड्यात पडलं व मातीने लडबडलं तरी ते केव्हा ना केव्हा तरी चमकणारच. रक्त रक्ताला खेचल्याखेरीज राहिल का? मधुकरला आठवण व्हायची, पण पलीकडे पाहिल्यावर विरघळायची, मधुकरला आईवडिलांना भेटावे असे वाटे. पण 'सरकारची' बंदी होती. तो बंदीवान होता. जेव्हा त्याचे दोनाचे चार हात झाले तेव्हा त्याचे दोन हात गळून पडले व तो हतबल झाला. पुरुषासारखा पुरुष पण स्त्री सारखा भित्रा झाला. दरवेशाने अस्वलाला खेळवावे त्याप्रमाणे स्त्री प्रेम त्याला खेळवीत होते. मधुबाला सांगे तसे तो वागे, मधुबालाने ताल धरावा व त्या तालावर त्याने नाचावे. त्यांनी जशी जागा बदलली तशी असली नावेही बदलली, मधुबाला झाली मधुराणी व मधुकर झाला मधुराजा, प्रेमाच्या मधुमध्ये राजा राणी डुंबत राहिले.

नवा संसार अत्याधुनिक पद्धतीने थाटण्यात आला. उंची फर्निचर, गाद्यागिर्द्या, कोचीस तर होतेच पण वाटेल तसे लोळता यावे असा सुंदर पलंग होता. घरात वीज खेळत होती. गॅस ? अं, तो तर मध्यम वर्गीय वापरतात. विजेची चूल होती. वंब ? हॅट, तो तर जुना जमाना, नवा जमाना गीझर होता. पंखा ? कोणीही हल्ली वापरतो, अर्थ नाही. एअर कंडीशनिंग होता. रेडिओ ? सगळीकडेच असतो रेडिओग्राम व रेकार्डर होता. शक्य तितक्या श्रीमंती सुखसोयी होत्या. नव्हती ती घरकामाला बाई. त्यांना ती अडचण वाटे. रिकाम्या वेळात बरिचशी कामे मधुराजाच करी, कामावर जाई तेवढीच त्याला मोकळी हवा. बाकी सारा वेळ घरात, असं जीवन हे डोईजड, कर्जाला आमंत्रण होय. राजाला कर्ज झाले. कर्जाच्या हप्त्यात निम्मा पगार जाई. मधुराणी चार चोपड्या शिकलेली. तिला नोकरी मिळणार कशी ? श्रीमंतीची ऐट खरी पण ती राखायला पैसे व श्रम लागतात. याची कल्पना त्या पाखरांना नव्हती, मधुराणीला ती आता कुठे येऊ लागली. दुकान भडबुंजाचे पण थाट बादशहाचा असा हा संसार. सुखाच्या मृगजलात आपण विहार करतो आहोत याची त्यांना अजूनही जाणीव नव्हती. त्यांची चैन व मजा चालूच. सिनेमा पहाण्याचा त्यांना भारी शोक, कारण तेथे अंधार असतो. अंधार हा प्रेमी जीवांचा आश्रय. नाटकात उजेड असतो. गैरसोय होते, म्हणून सिनेमापेक्षा नाटकाला गर्दी कमी असते की काय न कळे. वयात आलेली शृंगारिक नाटके त्यांना सुखावत. शृंगाराचा आविष्कार करणारे सिनेमा नाटके ते चुकवीत नसत. कॅबरेसाठी तर त्यांचा जीव तुटे. अशा प्रकारचे दिवस मजेत, सुखात व आनंदात चालले होते.

लग्न म्हणजे मौज, मजा, वासनांचा हैदोस असा त्यांचा समज. फुलातला मध चाखणाऱ्या फुलपाखरामुळे फुलाला फळ धरते याची जाणीव विषयात रमणाऱ्या रमणींना रहात

नाही. संसारात खर्चाचा गुणाकार जमेचा भागाकार होत जातो हे अशा तरुणतरुणींच्या ध्यानी कोठून येणार. शेवटी प्रेमाला फळ आले. पुत्ररत्न पदरात पडले. व्हायचे ते झाले. तशी मधुबालेला मुलांची आवड होती. पण सध्या नको होती. एक तर प्रेमात अडगळ व 'फॉर्म' की काय म्हणतात तो नाहीसा होतो. यापुढे तरी नको गं बाई ! उपचार चालू केले पण कर्म कां चुकतं ! दुसरे रत्न आलेच. दोन जिवांची जबाबदारी आली. खर्च वाढला, महागाई तर टी. बी. सारखी पैसा पोखरत होती. हस्ते पगाराचे लचके तोडीत होते ते मुलांच्या प्रेमात रंगून गेले. ते एकमेकांच्या व दोघे मुलांच्या प्रेमात व त्यांच्या लाडात इतके गुंग झाले की शेजाऱ्यापाजाऱ्याचे व भोवतालच्या समाजाचेही त्यांना भान राहिले नाही. प्रेम, मुलं व चैन या तीचाकीवर जीवन चालूच होतं. कर्ज वाढलं, हप्ते जाईनात, बिले थकली, तोही थकला. मग वायदे बाजार, थापाथापी सुरू झाली. कशीबशी वर्षे ढकलीत होते ते, पण चैनीत काही कमी करीत नव्हते.

करायला गेलो एकचा शेवटचा अंक चालू झाला. दिवस सुरू लागला, रात्र येऊ लागली. देणे इतके फुगले की ते देणे अशक्य झाले. वर्षे रेंगाळत चालली होती. खर्च वाढत होता. नुसत्या पगारावर श्रीमंती झुलवता येत नाही. तगादे लागले. पैसे आणायचे कोठून ! मधुराजा बेचैन झाला. त्या काळी काही सरकारी लॉटऱ्या नव्हत्या की ज्यावर आशा करीत राहावे. नाहीं तर नाही. मटका जुगार या पुरातन लॉटऱ्या तर आहेत ! मधुकरला पटलं. तो जुगार खेळू लागला. जिथं मटका तिथं मदिरा, मागोमाग मित्र. मधुकरला वाईट संगत लागली. कोणी सुचवलं पैसा मिळवण्यास चोरीसारखं सुलभ साधन नाही. तो चोऱ्या करू लागला. एक दिवस नेमका सापडला, चोरी केली मित्रांनी, पण चिरीमिरीचा उपयोग करून ते झाले नामानिराळे. मधुकर अडकला, त्याला शिक्षा झाली. इकडे घरावर टांच आली. होतं नव्हतं ते सगळं गेलं. आई व दोन मुले उघडी पडली. वेळ आली की बळ येतं. मधुबाला मुळात हुषार पण भलत्याच प्रेमाखाली तिची बुद्धि झाकाळली होती. ती जागी झाली. एका कारखान्यात रोजींदारीची नोकरी तिने धरली. कसेबसे दिवस रेटी. दोन वर्षांनी मधुकर येईल, दिवस बदलतील या आशेवर ती जगत होती. सकाळी कामावर जाई व संध्याकाळी ती परत येई, मुलाना शिक्षण नाही. झोपडपट्टीची संगत. उनाडक्याखेरीज उद्योग नाही. गोट्या, काजू, पतंग यात दंग. पतंगाच्या काटाकाटीच्या खेळात सडकेवरून धावत असता बसचा धक्का लागून दोन्ही मुले खलास झाली. बिचारी मधुबाला आता एकटी राहिली, पोटासाठी कसंबसं काम करी. खंगली बिचारी. मुलांमागे सहामहिनेही तिने पाहिले नाहीत.

मधुकर सुटून आला. सगळी वाताहत पाहून त्याला धक्का बसला. तो वेडा झाला. मधुबालेच्या शोधात गावभर भटके. एके दिवशी रस्त्याने जाताना त्याला बसचा धक्का बसला. तो बेशुद्ध झाला. पुन्हा काही शुद्धीवर आला नाही. 'करायला गेलो एक'ची भैरवी झाली नि नाटक संपले.

# ३८९ नंबरचा तो हमाल

— सीताकांत दत्ताराम कामत,
२/२९, " श्री गुरुदत्तप्रसाद,"
घनःश्याम गुप्ता रोड,
विष्णु नगर, डोंबिवली.

ऑगस्ट १९७१ मधील ही घटना. मीझो लोकांच्या सहवासातील मीझोलँडमधील माझी कारकीर्द संपली होती व पुन्हा: मुंबईला बदली झाली होती. आतिथ्यशील, निष्कपटी मीझो लोकांचा व माझ्या इतर देशबांधवांचा प्रेमपूर्वक आशीर्वाद बरोबर घेऊन मी या दीर्घ प्रवासाला सुरवात केली. मीझोराम ते सीलच्चर पर्यंतचा प्रवास म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत. ड्रायव्हरचा किंचित् कंट्रोल गेला तर क्षणात बस किती खोल दरीत जाईल ते सांगता येत नसते. शिवाय निसर्गाची पण कृपा पाहिजेच. केव्हा Land-Slides होतील सांगता येत नसते. कशीबशी सुरळीतपणे आमची बस सिलचरला आली. सिलचर ते मुंबईचा प्रवास रेल्वे-गाडीने करावा लागतो. सुदैवाने एका मिलिटरी ऑफिसरच्या मदतीने मला पटकन तिकीट व बर्थ मिळाला. गाडी मोठमोठे बोगदे व खोल खोल दऱ्या पार करीत गोहत्ती स्टेशनजवळ आली. मी नुसताच लेटलेलो होतो. कंटाळवाण्या प्रवासामुळे डोळ्यावर झोप होती, अंग आंबलेले होते. वेळ सकाळची ११ ची. पण मी खात्रीने सांगू शकतो की मी पूर्ण झोपलेलो नव्हतो. अेवढ्यात अेक साधारण ५०–५२ वर्षांची फकीराच्या वेशात भगवी कफनी घातलेली आकृती माझ्या डोळ्यापुढे उभी झाली. त्याची दाढी लांब व शुभ्र होती व हिंदी भाषेत त्याचे पुढील शब्द माझ्या कानी पडले, " बाबू यहाँही उतर जाव, शहर जरा घूमके देखो, यहाँ के कामाक्षा मंदीर का भी दर्शन लो " हे शब्द अैकताच मी ताडकन उठून बसलो व बघतो तर ती आकृती अेकदम अदृश्य. तसा भी फार बेचैन झालो. मनाला एक प्रकारची हूरहूर लागून गेली. काय करावं समजेना. बदलीवर मी येत होतो. त्यामुळे बरोबर बरेच सामान होते. खाली उतरायचे तर एवढे सामान बाहेर काढायचे, व पुन्हा चढवायचे पुन्हा सीट मिळवणे म्हणजे दिव्य. सर्वच दगदग. काय करावं काहीच सुचेना. विचार करता करता गाडी गोहत्ती स्टेशनवर केव्हा थांबली ते कळलेच नाही. गाडी थांबल्याबरोबर हमाल आत घुसले. सत्य

सांगतो विश्वास ठेवा, मघाशी फकीराच्या वेशात दिसला होता त्याच चेहेरे-पट्टीचा एक हमाल, फक्त फरक एवढाच की भगव्या कफनीऐवजी त्याने लाल डगला घातला होता. त्याने चक्क माझी बॅग उचलली व खाली उतरला. त्याच्या मागोमाग मला उतरणे भाग पडले. त्या हमालाचा नंबर होता 389. भराभर माझे इतर सर्व सामान उतरवून घेतले व क्लॉक-रूममध्ये जमा केले व स्टेशनवरच आंघोळीला गेलो. मनसोक्तपणे आंघोळ उरकून बाहेर आलो तोच एक भयंकर दुःखद वार्ता कानावर आली. ज्या गाडीतून मी आलो होतो ती गाडी आठ किलोमिटर पुढे जाताच तिला अपघात झाला. बरेच प्रवासी मृत्यूच्या जबड्यात तर कित्येकजण जखमी. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. माझे प्राण वाचवल्याबद्दल मनोमन कुलदैवतेचे मी आभार मानले व मला जबरदस्तीने खाली उतरविण्यास भाग पाडणाऱ्या त्या हमालाचा सर्व स्टेशनवर शोध केला. पण तो हमाल कुठेच सापडला नाही. ३८९ नंबरचा हमाल त्या स्टेशनवर नाहीच असे सांगण्यात आले. तर मग मला जबरदस्तीने उतरविणारा तो हमाल कोण? काहीच उलगडा होऊ शकला नाही. मला झालेल्या दृष्टांताप्रमाणे मी गौहत्ती शहर फिरून पाहिले व तेथील कामाक्षामातेचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी पुन्हा पुढच्या प्रवासास सुरवात केली. गाडी नाशिकला पोचल्यावर पुन्हा एक प्रकारची हूरहूर मनाला लागली. त्यामुळे तिथे उतरून मी कोपरगावमार्गे शिर्डीला श्रीबाबांच्या दर्शनास गेलो. आणि काय आश्चर्य! मला गोहत्ती येथे दिसलेला तो फकीर, तो हमाल आणि समोर असलेला तो भव्य पुतळा एक आणि एकच असल्याची मनोमन खात्री झाली. बाबा खरोखरच थोर तुझे उपकार. अशा तऱ्हेने ध्यानी मनी नसताना माझी शिर्डीला झालेली ही पहिली वारी. त्यानंतर नियमीत मी शिर्डीला जातो. माझ्यावर अनेक संकटे आली आहेत, पण बाबांचे नाव घेताच ती कुठच्याकुठे पार उडून जातात. खरोखर बाबा तुझी लीला अगाध आहे.

श्रीसाईभक्तांनो इकडे लक्ष द्या—

# श्रीसाईनाथ डिरेक्टरी म्हणजेच

## श्रीसाईबाबांचे कोण, कुठे ?

श्रीसाईबाबांचे भक्त भारतभरच नव्हेत तर जगात सर्वत्र पसरलेले आहेत. या सर्व बाबाभक्तांची नावे व पत्ते एकत्र करण्याचे कार्य श्रीसाईलीलेने सुरू केलेले आहे. प्रथम मुंबई-महाराष्ट्रातील साई-प्रेमींची नावे-पत्ते एकत्र करून ते प्रथम टंकलिखित करून व्यवस्थित बांधून साई-प्रेमींना पुरविले जाणार आहेत. या कामी आपले संपूर्ण सहकार्य अत्यावश्यक आहे. आपण हे निवेदन **वाचताच** एका पोस्टकार्डावर पुढील विचारलेली माहिती योग्य त्या तक्त्याप्रमाणे **त्वरीत** लिहून पाठवावी ही विनंती. माहिती पाठविणाऱ्याचे वय वीस वर्षांपेक्षा कमी असता कामा नये. एका व्यक्तीला एकच कार्ड पाठविता येईल. कुटुंबातील अनेक व्यक्ती साईभक्त असतील तर कुटुंब प्रमुखानेच कार्ड लिहून पाठवावे व शेवटी इतरांचा उल्लेख करावा. आपले पोस्टकार्ड पाठविण्याचा पत्ता—संपादक : श्री साईलीला (श्रीसाईनाथ डिरेक्टरी), साईनिकेतन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४.

**माहिती पाठविण्याचा तक्ता :—**

संपूर्ण नाव ( प्रथम आडनाव ) ... ... ... ... ... ... ... ... ...

संपूर्ण पत्ता ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

वय ... ... ... ... ... ... ... ... ... दूरध्वनि ... ... ...

शिक्षण ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

सध्याची नोकरी / धंदा / व्यवसाय इ. ... ... ... ... ... ... ...

कुटुंबातील इतर साईप्रेमी मंडळी ... ... ... ... ... ... ... ...

शिर्डीस प्रथम भेट ... ... ... ... ... ... ... ... ... ... ...

श्री साईभक्तांची खानेसुमारी करण्याच्या दृष्टीने या माहितीचा उपयोग होणार असून श्रीबाबांच्या येत्या साठाव्या महानिर्वाण उत्सवातही खूप उपयोग होणार आहे. याशिवाय साईभक्तांना पत्राने मैत्री आणि भक्ती साधण्यासाठी या माहितीचा फार मोठा फायदा होणार आहे. माहिती तक्ता पाठविण्याची अंतीम तारीख **३१ मे १९७६** ही आहे.

रंजक माहितीपूर्ण लेख

# संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबा आणि मरहूम खाँसाहेब अब्दुल करीमखाँ

निवेदक :— संगीताचार्य पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी,
संचालक श्री सरस्वती संगीत विद्यालय,
स्वस्तिक हाऊस, २८५ डॉ. भडकमकर मार्ग, मुं. ७



पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी

खाँसाहेब अब्दुल करीमखाँ भारतीय किर्तीचे एक श्रेष्ठ गायक होऊन गेले. ते किराणा घराण्यातील सुरेल गायक म्हणून विख्यात होते. १९३७ साली ते पैगंबरवासी झाले. हयात असताना ते असे काही दर्दी गवई होऊन गेले की त्यांच्या नावाचा उच्चार हीच संगीत शौकिनामध्ये एक विलक्षण जादू मानली जात असे. त्यांचे गाणे ही एक अशी मोहिनी होती की जिच्यामुळे 'ब्रम्हानंद सहोदर' असा आनंद श्रोत्यांना प्राप्त होत असे.

१९१४ साली अमळनेरच्या श्रीमंत प्रतापशेटजींनी त्यांना एकदा निमंत्रण दिले. व त्यांच्या दोन बैठकी करून त्यांना योग्य बिदागी, वस्त्र वगैरे देऊन त्यांचा बहुमान केला. खाँसाहेबांचा तिथे तिसरा जलसा जो झाला तो जाहीर होता. या जाहीर जलशात शिरडीच्या श्रीसाईबाबांचे अनेक भक्त आलेले होते. त्या सर्वांना खांसाहेबांचे गाणे खूप आवडले. त्यांनी खांसाहेबांना श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन त्यांची आपण सेवा करावी असे सांगितले.

अब्दुल करीमखांना सुरुवातीपासून साधू-संतांच्या सहवासाचे वेड होते. श्रीमंत प्रतापशेट व इतर साईभक्तांनी शिरडीबद्दल सांगताच त्यांनी आपले मालेगाव व अन्य ठिकाणचे कार्यक्रम रद्द करून शिर्डीस जाण्याचा निर्णय घेतला. प्रतापशेट व नागपूरचे श्रीमंत बुटी व धनवटे इ. मंडळींनी खांसाहेबांना प्रवासाची सोय करून शिरडीस पोचवले.

त्यावेळी आताची शिरडी व तेव्हाची शिरडी यात जमीन अस्मानाचे अंतर होते. सर्वत्र दाट जंगल, रातकिड्यांची किरकिर, रस्ते नाहीत, साप किरड्यांची भिती फार



फेटा बांधलेले अब्दुलकरीम खाँ व त्यांचे बंधू अबदुल हक्

शेतवाडीमुळे चिखल भरलेला अशा एका ठिकाणी एका चौकीत पेटत्या धुनीसमोर हातात चिलीम घेतलेली साईमहाराजांची मूर्ती बसलेली असे. खांसाहेब उतरले ते कोते पाटील यांच्या घराच्या ओटीवर, पण त्या दिवशी सायंकाळपर्यंत खांसाहेबांना साईंचे दर्शन झालेच नाही. नित्याप्रमाणे सायंकाळी नेहमीची भजनमंडळी व गावातील काही दर्शन घेणारी मंडळी साईबाबांच्या चौकीसमोर जमली. त्यात खांसाहेब व त्यांची मंडळीही बसलेली होती. साईबाबांचे पहिल्या प्रथम दर्शन घेताच खांसाहेबांची मनोमन खात्री झाली की ही व्यक्ती काही कमी नाही, पूर्ण देवासक्त व्यक्ती आहे. खांसाहेबांनी बाबांच्या संबंधीची बारीकसारीक गोष्टींची विचारपूस इतरांकडे केली खरी पण एवढ्यातच साईबाबांची कृपादृष्टी खांसाहेबांवर झाली. बाबांनी खांसाहेबांची चौकशी केली व त्यांना एखादे भजन अभंग म्हणण्यास सांगितले.

खांसाहेबांनी तंबोरे वगैरे आणण्याबद्दल विचारताच साईबाबा म्हणाले, "आता हत्यार मंग ! आता तसाच गा. लय वक्त झालाय. एकाद मराठी गीत येताय का न्हाई. म्हण म्हण तसाच."

खांसाहेबांनी त्या भजनी मंडळीच्या वाद्यातच "हेचि दान देगा देवा" हे भजन पिलू रागात, राग विस्तार न करता अर्धा तास अशा तऱ्हेने आळवला की उपस्थित मंडळी तर हेलावलीच, पण साईमहाराजसुद्धा इतके तल्लीन झाले की ते डोळे मिटून एकाग्रतेने ऐकत होते.

खांसाहेबांचे गायन संपल्यावर डोळे उघडून साईबाबा म्हणाले, 'काय कोण कसा गायका हा मुसलमान ! अरे दान असा मागतो. हाय की द्यावसं वाटतं 'बघ' नाहीतर तुमी लोकानो दान दे नाय तर मारतो बघ. तुम्ही लोक तर "हेचि दान देगा देवा" म्हणून बोंबल्या मारता.'

त्या दिवशी केवळ खांसाहेबांच्या गाण्याच्या कार्यक्रमामुळे श्रीबाबांच्या रात्रीच्या आरतीला अर्धा पाऊण तास वेळ झाला. आरती वगैरे झाल्यावर साईबाबा खांसाहे-

बांकडे वळून म्हणाले, "आता इथून इलक्यात जायचे नाही बरं का ! घरची चिंता करायची नाही. सगळं ठीक होईल आणि हे पहा कोतोबा या गवयांची बादशाही व्यवस्था ठेवा."

दुसऱ्याच दिवशी सकाळी प्रतापशेटजींचा माणूस खाँसाहेबांची तार घेऊन आला. त्यावेळी शिरडीला डाकघर नव्हते. अमळनेरला कार्यक्रम होता व पोस्टकचेरी होती म्हणून त्यांच्या पत्नी ताराबाईने तार केली होती. "गुलबकावली (गुलूताई) खूप आजारी आहे परत या." गुलबकावली म्हणजे खाँसाहेबांची कन्या. आज ती हयात आहे.

खाँसाहेबांनी तार साईबाबांना दाखविली. पण बाबांनी चिंता न करण्याबद्दल सांगून सगळ्यांनाच शिरडीला घेऊन येण्यास सांगितले. बाबांच्या आज्ञेप्रमाणे खाँ-साहेबांनी रामकृष्ण शिरोडकर व रामकृष्ण बोडस या दोघा आपल्या परिचिताना पुण्यास पाठवून सर्वांनाच शिरडीला आणवले. आश्चर्याची गोष्ट अशी की त्या सर्वांच्याबरोबर खाँसाहेबांचा लाडका कुत्रा टिपूमिया हा पण आला. हा टिपूमियाँ खाँसाहेब बैठकीला किंवा रियाजला बसले की त्यांच्या समोर येऊन बसे व कित्येकदा तर तो स्वर पण आळवी.

खांसाहेबांच्या १५–२० मंडळींचा मुक्काम कोते पाटलांच्या घरीच होता. ताराबाईने पाटलीणबाईंना सांगितले की, "आमचे स्वयंपाक पाणी आम्ही करतो. आमचा मनुष्य आहे शिवाय मंडळीही खूप आहेत."

पण त्यावर पाटलीणबाई म्हणाल्या, "बाई तुमी म्हणता तसं कराया मला महाराजांचा हुकूम न्हाय, तुमची बडदास्त ठेवाचा हुकूम हाये. तवा तुमी आमाला हवं नको ते सांगा. आमी करू." यावर ताराबाईचा नाईलाज झाला. पाटीलबाईंनी विचारपूस केली तेव्हा ताराबाई पण गात असल्याचे त्यांना समजले.

दुसऱ्या दिवशी ताराबाई शिरडीस पोचताच आपले सारे काही विधी आटोपून गुलूताईला साईबाबांच्या पायावर आणून तिने घातले. गुलूताई अगदी बेहोष होती, इतकी की परत पुण्याला जाईल की नाही ही शंका होती. पण साईबाबांनी चमत्कार दाखवला. गुलूला पायावर घालताच त्यांनी तिच्या तोंडात गुळाचा खडा व चिलमीतील उदी घालून तीर्थ पाजले आणि काय आश्चर्य पहा ! बेहोष गुलू अगदी खडखडीत बरी झाली. खांसाहेबांसहीत साऱ्या साऱ्यांनी बाबांची करुणा भाकली, प्रार्थना केली व जाण्याची परवानगी मागितली.

पण खांसाहेब मंडळींना साईबाबांकडून जाण्याची परवानगी चांगली दहा दिवसपर्यंत मिळाली नाही. मुक्कामाच्या सातव्या दिवशी हो, नाही करता करता ताराबाईने रियाज केला तेव्हा "शेवटची विनवणी संतजनी परिसावी" ही विनवणी भैरवी रागात सकाळचे प्रहरी म्हटली व नंतर "घालीन लोटांगण वंदीन चरण" हे एकाग्रतेने म्हटले,

त्यामुळे सारेच श्रोते अक्षरशः खूष झाले. स्वतः साईबाबा तर हर्षीत झाले, अति आनंदीत झाले.

खांसाहेबांना पुण्यातल्या आपल्या विद्यालयाची चिंता वाटत होती. अतींद्रिय साईंनी त्यांच्या मनातील ती व्यथा ओळखून म्हटले, "आता जायची ओढ लागली ना, सवा पुण्याला जाऊ नको, आता वऱ्हाडकडं जा. भलं होईल. आता कपाशीचा हंगाम आये." खांसाहेबांनी त्यांच्या आज्ञेप्रमाणे करण्याचे ठरविले व बरोबर दहावे दिवशी खांसाहेब मंडळींना जाण्याची परवानगी मिळाली. बाबांनी कोते पाटलांना सांगितले, "उद्या याला परवानगी आहे, तेव्हा याचे तंबोऱ्यावरचे गाणे होऊ द्या. गावातल्या मंडळींना बोलवा. समद्यांना ऐकू द्या."

त्या रात्री खांसाहेबांनी आपली बैठक जमविली. बरीच मंडळी जमली होती. साकोरीहून उपासनी बाबांची भजनी मंडळी पण आली. याशिवाय अमळनेरचे प्रतापशेट, नागपूरचे धनवटे, श्रीमती बुटी, पोफळेसाहेब आणि श्रीरामपूर, कोपरगाव इ. ठिक-ठिकाणाहून मंडळी आली होती. खांसाहेबांनी साईबाबांच्या भजनी मंडळींना बाबांची आवडीची भजने, अभंग इ. विचारून घेऊन ते पाठ केले होते.

प्रत्यक्ष बैठकीत खांसाहेबांनी प्रथम दरबारी कानडातील "और नहीं कछू काम की। मैं भरोसे अपने राम की" हे पद अर्धा एक तास उत्कृष्टपणे गाऊन झाल्यावर साईबाबांना अत्यंत आवडणारे असे भजन "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले" हे तन्मयतेने म्हटले. त्यानंतर संत कबीरजींचा दोहा "इस तन धन की कौन बढाई। देखत नैन में मिट्टी मिलायी।" हे जोगीया रागात म्हटले. शेवटी पिलू रागात "काया कैसी रोयी तजो दियो रे प्राण।" हे उंच स्वरात गाण्यास सुरुवात केली. खांसाहेबांची ही सारी गाणी व एकंदरीत कार्यक्रम श्री साईबाबांना खूप खूप आवडला.

रात्री दीड वाजता कार्यक्रम संपला. तेव्हा बाबांनी खांसाहेबांना जवळ बोलवून त्यांच्या डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद देऊन पाठीवरून हात फिरवला आणि चांदीचा एक रुपया देऊन सांगितले, "हा रुपया खर्चू नकोस, नेहमी खिशात ठेव." तसेच ताराबाईस पाच चांदीचे रुपये देऊन ते पेटीत ठेवण्यास सांगितले व परातभर पेढे तिच्या ओटीत घातले.

आणि अशी ही गोड स्मृती हृदयात ठेवून खांसाहेब मंडळींनी शिरडीचा निरोप घेतला. त्यावेळी पाटलीणबाईंनी दोन डझन भाकऱ्या व मोठा डबा भरून लसणीची चटणी आणि भला मोठा लोण्याचा गोळा बांधून वाटेसाठी शिदोरी दिली. भल्या पहाटे कोपरगाव गाठून मनमाडमार्गे ही मंडळी बाबांच्या सांगण्याप्रमाणे नागपूरला पोचली व नागपूर येथे करीमखांची आणि तेथले ख्यातनाम संत श्री ताजुद्दीन बाबा यांचेशी मुलाकात झाली. ताजुद्दीन बाबा हे श्री साईबाबांचेच समकालीन होत.

# महिमा महाराष्ट्राचा

महाराष्ट्रात केवळ गोदावरी नदीच वाहात नाही तर तिच्या रूपाने साक्षात अक्षरगंगाच वाहते आहे. या गंगेत स्नान करण्याचे देवदुर्लभ सौभाग्य महाराष्ट्राला लाभले याहून आणखी काय हवे ! महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी म्हणूनच महाराष्ट्राचे सौभाग्यस्तोत्र असे गातात :—

"महंत राष्ट्र म्हणिजे महाराष्ट्र : महंत म्हणजे थोर :
महाराष्ट्र सात्विक : तेथचे जड चेतन पदार्थ तेहि
सात्विक : तेथे असता शारीर, मानसिक,
कव्हणीचि उपद्रव नुपजति : आणिक देशी
शारीर, मानसिक उपद्रव उपजला असे, तो
महाराष्ट्री असता शमे : येथचा अन्नोदकी शमे :
येथच्या औषधी शमे : येथचा वारा झाडे पाऊस
तोहि सात्विक : तेणे सकळ उपद्रव शमेति :
महंत म्हणिजे निर्दोष : आणि एक निर्दोष
होती, परि सगुण नव्हेति : महाराष्ट्र निर्दोष
आणि सगुण : तेथे असता अनाचार
करावयाची बुद्धि नुपजे : आणि
उपजली तरी करू न लहाइजे : आपण
अनाचार न करी : आणिकासि करू
नेदीति ते महाराष्ट्र : धर्मसिद्धि
जाथे ते महाराष्ट्र :"

संग्राहक — बाळकृष्ण सदाशिव धामणकर
सहकार नगर, विभाग ३, इमारत क्रमांक २/३३, चेंबूर ७१

**मासिक भक्तिसंगम**

धर्म, तत्वज्ञान, संत-सत्पुरुष व देव देवता यांचा मधुर संगम—

**संपादक**—श्री. सुधाकर सामंत, वा. वर्गणी रु. दहा

योगभवन (आवळे बिल्डिंग) २ रा मजला, १८ ई, भवानी शंकर पथ,
दादर मुंबई ४०० ०२८

158

नवे सदर

# वाचकांचा पत्रव्यवहार

" साईलीला " ह्या मासिकाच्या माध्यमातून योगीराज श्री सद्गुरू साईनाथ महाराजांविषयी अनेक भक्तांचे चमत्कार तथा साक्षात्कार जनतेसमोर मांडण्याचे महान कार्य संपादक – कार्यकारी संपादक, लेखक तथा कवि ही जी मंडळी करीत आहेत त्यांस माझे शतशः धन्यवाद !

## तद्वतच

संत हे एकच हा आपला विशाल दृष्टिकोन आपल्या मासिकातील श्री संत गुलाबबाबा काटेल-कोलद, सती अनुसया माता, पारडसिंगा, अवलिया श्री संत ताजुद्दिन बाबा, नागपूर ह्या इतरही संतांविषयीचे लिखाण आपल्या मासिकातून वारंवार प्रसिद्ध झाल्यामुळे आम्हांस पहावयास मिळते. ह्याबद्दल आपण गौरवास पात्र आहात.

विशेषतः मला सांगावेसे वाटते की, 'श्री साईलीला' मासिकाचा जास्तीत जास्त प्रचार व्हावा या उद्देश्याने मी स्वतः कार्यरत असून सगळ्या पाठकांशी माझी नम्र विनंति आहे की त्यांनीसुद्धा या दिशेने पाऊल उचलल्यास श्री साईचा अधिकाअधिक कृपावर्षाव होईल.

कवि — दा. ना. देशमुख
रामजी पहेलवान बाडा, सक्करदरा रोड,
चिटणीसपुरा, नागपूर

**(श्री साईलीलेतील लेख–कविता इ. मजकूराचा अभिप्राय दर्शविणारी पत्रे संपादकांकडे अवश्य पाठवावीत त्यांचा परामर्ष या नूतन सदरातून अवश्य घेतला जाईल. —संपादक)**

**नोंदणीच्या अखेरच्या तारखेत एक महिन्याची वाढ**

येत्या गुरुपौर्णिमेस
पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे—

# * श्री साईनाथ *

**( श्री साईलीलेतून क्रमशः प्रसिद्ध झालेले ललित चरित्र )**

लेखक : **र. श्री. पुजारी**, पुणे

- सुधारित व वाढीव आवृत्ती- पृष्ठे सु. ४०० (क्राऊन)
- प्रकाशनपूर्व सवलतीची किं. रु. **दहा** फक्त.
- **नोंदणीची अखेरची मुदत : ३१ मे १९७६.**
- १ जून १९७६ पासून किं. रु. **पंधरा.**
- प्रत घरपोच हवी असल्यास व्ही. पी. च्या प्रत्यक्ष खर्चाइतकी (सुमारे ३ रु. प्रतीस ) व्ही. पी. करू. ती सोडवून घ्यावी. प्रत आमचेकडे समक्षही मिळेल.
- मनिऑर्डरने **आगाऊ** पैसे पाठविण्याचा पत्ता : **र. श्री. पुजारी,**

**जयश्री प्रकाशन,** (पेरुगेट **मुलांच्या** भावे स्कूलसमोर)
९९२ सदाशिव पेठ, पुणे—३०

# शिरडी-वृत्त-माहे मार्च १९७६

मार्च महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनाकरिता बाहेरगावची भक्त मंडळी नेहमी-प्रमाणे बहुसंख्येने आली होती. काही कलाकारांनी श्रींचेपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

कीर्तन — १ ) श्री ग. वि. जोशी शास्त्री संस्थान, मुंबई यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली. २ ) ह. भ. प. कपिलेश्वर सोनवणे आळंदी.

प्रवचन — १ ) ह. भ. प. लक्ष्मणबुवा बाघचौरे शिर्डी.

भजन, गायन वादन — १ ) श्री कलावती देवी भजनी मंडळ, लक्ष्मीवाडी. २ ) स्वामी रामानंद वेळगाव. ३ ) श्री. बाबूराव वि. बांदिवडेकर मुंबई. ४ ) श्री. गोपाळ वि. गावडे मुंबई. ५ ) श्री. इ. एज. धनसिंग, पुणे. ६ ) श्री. श्रीराम वि. सातडेकर, मुंबई. ७ ) श्री. लक्ष्मीनारायण नागपूर. ८ ) श्री. चंद्रशेखर ज. गाडगीळ पुणे. ९ ) श्री. असलमखान, पुणे. १० ) श्री. रामभाऊ कदम पुणे. ११ ) श्री. विठ्ठल क्षीरसागर सोलापूर. १२ ) श्री. दत्ता कुलकर्णी सोलापूर. १३ ) श्री. नंदू ज. भोरसे मालेगाव.

**गुढीपाडवा** — गुढीपाडवा नवीन वर्षारंभानिमित्त संस्थानतर्फे श्रीसाईबाबांना महाअभिषेक करून मंदिराचे कळसाजवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर रात्री हरिकीर्तन कार्यक्रम झाला.

**सन्माननीयांच्या भेटी** :— १ ) मा. श्री. वी. जे. खताळ विधी न्याय व पाटबंधारे मंत्री, महाराष्ट्र राज्य २ ) मा. श्री. एन्. के. पारेख, सिटी सिव्हील कोर्ट, जज्ज मुंबई. ३ ) मा. पी. सी. श्रीवास्तव इनकम टॅक्स कमिशनर दिल्ली. ४ ) मा. श्री विलासराव पाटील प्रांत ऑफिसर संगमनेर. ५ ) मा. श्री. कुकरेजा आय. जी. पी. मध्यप्रदेश. ६ ) मा. श्री. कांबळी डिस्ट्रिक्ट सेशन्स जज्ज ठाणे. ७ ) मा. श्री. मेजर जनरल आय. एम्. रा. रा. जनरल ऑफीसर कमांडिंग गुजराथ व महाराष्ट्र, मुंबई.

**संतांच्या भेटी** :— १ ) संत गजानन महाराज शेगाव यांची पालखी दि. १६–३–७६ रोजी शिर्डीत साईमंदिरात आली त्यावेळी, श्रीसाईबाबा संस्थानतर्फे पुष्पहार घालून पालखीचे स्वागत केले.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# आराधना

ज्याच्या मुखी नित्य असे साई नाम
तयाचे सहज साध्य होईल काम।

साई साई म्हणेल जो ठायी ठायी
तो हा भवसागर सहज तरुनी जाई।

गाईल जो नित्य भैरवी बाबांची
त्याला ना उरे दुःख चिंता कशाची।

ठेवी डोके जो साई चरणावरती।
मनी वाटे त्यास मिळाली आज मुक्ती।

– कु. शोभा आळवे
४/७२, भारतीय विद्या भवन,
दत्ताराम लाड मार्ग,
लालबाग, मुंबई नं. १२.

---

# उठी उठी साईनाथा !

उठी उठी बा शिरडीच्या साईनाथा दारी वैष्णवाचा मेळा।
दाऊनी मुखकमला करी कृतार्थ या जना
पूर्व क्षितीजेवरी निशा रंगली उषा होऊनी
हाती कमळे घेऊनी आली भक्तीची
उठी उठी बा शिरडीच्या साईनाथा दारी वैष्णवाचा मेळा।
दाही दिशा पाहती वाट तुझी होऊनी आसक्त
घेऊनी ह्या कटीवरी मंगलतेचे घट
भिमाचंद्रभागा तिष्ठती दारी तुझ्या पादक्षालनार्थ
उठी उठी बा शिरडीच्या साईनाथा दारी वैष्णवाचा मेळा।
दाऊनी मुखकमला करी कृतार्थ या जना

– सौ. कलावती व. चव्हाण
अंबाबाई मिस्त्री निवास,
सेनापती बापट मार्ग, दादर, मुंबई नं. २८.

८१२

# साईचे रूप

गोड तुझे नाम गोड तुझे रूप
साईचे स्वरुप दिसते अंतरी ॥ध्रु.॥
राम रूप पाहता आयोध्या नगरी
दिसते समोरी सिंहासनावरी ॥१॥
द्वारका माईत कृष्ण तो मुरारी
सेरडीत आहे साईलीला सारी ॥२॥
अल्ला मालीक म्हणे वारंवारी
भेद भाव नाही तया महाद्वारी ॥३॥
नद्या नाले सर्व मिळती सागरी
भक्ताचा कैवारी आहे ब्रह्मचारी ॥४॥
मनो भावे करा तया सेवा चाकरी
साई नाम घेता आस होय पुरी ॥५॥
साई तो विठ्ठल सेरडी पंढरी
नाम जप गाता करावी ती वारी ॥६॥
दत्तु म्हणे भाव ठेवा साईवरी
जाल ऊद्धरी मोक्ष द्वारी ॥७॥

साईसेवक : दत्तात्रय महादेव मोरे
४७० शिवाजी नगर, पुणे ५.

---

# मनात मूर्ती तुझीच वसू दे

साईनाथा मनात मूर्ती तुझीच वसु दे, असेच होऊ दे ॥ ध्रु. ॥
हतभाग्य जेथे प्राणी सेवा घडो तयाची ।
जनता जनार्दनाची तैसीच तुझ्या भक्ताची ।
तुझ्याच रूपे सर्व हे दृष्टीस पडू दे ॥ १ ॥
संसार सागराच्या भ्रमात फिरती सारे ।
तुझेच अंशधारे लाचार फिरती कारे ।
सर्वांच्या मनात भक्ती, तुझीच जडू दे ॥ २ ॥
भक्तजन तुजसी जोडूनी हात बोले ।
अज्ञान या जनाशी तारून तुच न्यावे ।
तुझाच ध्यास त्यांना, दिनरात घडु दे ॥ ३ ॥

— सुदाम रा. उघडे
मु. सायखेडा (ग्राम),
पो. गोडेगाव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ.

# सर्व साक्षी माझे बाबा

साई माझा असता
कोणाचीच भीती
काय सांगू भक्ता
त्याची माझी प्रीती ॥ ध्रु ॥
माझ्या साईचे हे रूप
आनंदाचे ज्ञान स्वरूप
जाळुनीया अंतर्यामी
देहाच्या त्या दिव्य वाती ॥ १ ॥
शिरडीच आहे माझे
सुखासीन घरदार
उल्हासीत मन माझे
ओवाळून पंचारती ॥ २ ॥
सर्व साक्षी माझे बाबा
नमस्कार चरणी माझा
देह नाही तुझा दूजा
चरण कमल माझे माथी ॥ ३ ॥

—शशिकांत व. तोंडवळकर
डी/२६, मेघवाडी, लालबाग,
डॉ. राव मार्ग, मुंबई १२

---

# निर्माता तू ठावे

काष्टी पाषाणी, जळीं स्थळीं तू देहीं,
वात्सल्य करि तरी, देखुनि भाव भलाही !
आणुनी आपदा, घेसी भक्त-कसोटी,
संकटी रक्षिसी, नाम घुमे ज्या ओठीं !
कीर्तीच्या शिखरी, बैसविसी भक्तांसी,
ढासळू न देशीं, तू त्या अढळ पदासी,
चल अचल सृष्टीचा, निर्माता तू ठावे,
स्तवनात तुझ्या हे, अवचित करहि जुळावे !

—लक्ष्मीतनया

# स्मरा नित साईप्रभूचे नाम

[ श्री साईबाबांच्या नामसंकीर्तनाने या गीतमालेचा मंगलाचरण आळवू या. शिरडीचा तो श्यामल हरी अद्यापही संसाराच्या त्या यमुनेच्या काठी आपल्या दिव्य लीला उधळीत उभा आहे. त्या प्रेमस्वरूप प्रभूचे मंगल नाम आज रूपरंगरस स्पर्शगंधाने सुगंधित होवो. त्या दिव्य नामरसात अमृताची गोडी एकवटो. साऱ्या त्रिभुवनाला साईनामाच्या संगीतमय सप्तस्वरांशी ताल धरून नाचू दे. देह, मन, बुद्धी, प्राण आणि अहंकार यांना नामरसात लय घडू दे. कंठ दाटू दे, हृदय भरू दे, नेत्र झरू देत, रोमांचाने अंग अंग मोहरू दे. या नामातून साक्षात् वैकुंठपीठ आपल्या सगुण साजिऱ्या रूपासह प्रकटू दे. ]

स्मरा नित साईप्रभूंचे नाम । संसाराच्या यमुनातीरी खेळत हा घनःश्याम
रूप रंग रस स्पर्श सुगंधित
या नामाचे अखंड संगित
काळ धरुनिया ताल गाऊं दे नाम वेद अभिराम ॥ १ ॥ ( स्मरा नित. )
प्रभुनामाचे पायीं पैंजण
तोलित सरगम नाचो त्रिभुवन
नाम रसातुन समरसु दे या सात सुरांचा साम ॥ २ ॥ ( स्मरा नित. )
मृदंग, वीणा टाळ झडू दे
अस्तित्वच संगीत घडूं दे
नामासंगे झंकारू दे अवघे अंतर्याम ॥ ३ ॥ ( स्मरा नित. )
या नामाची अवीट गोडी
अमृत रसाला कळु द्या थोडी
नाम नसे, हा प्रभुचरणावर एक अखंड प्रणाम ॥ ४ ॥ ( स्मरा नित. )
कंठ भरू दे, हृदय झरू दे
जीवन अवघे नाम उरूं दे
जीव भाव हरवून घेऊ दे प्रेमरसात विराम ॥ ५ ॥ ( स्मरा नित. )
भगवंताचा मंगल महिमा
परि नामाची त्याला सीमा
नामामधुनी रूप घेऊ दे वैकुंठीचे धाम ॥ ६ ॥ ( स्मरा नित. )

— चकोर आजगांवकर
वाय ११/१६९ गव्हर्नमेंट क्वार्टर्स
बांद्रा ( पूर्व ) मुं. ५१

# श्री साई - वन्दना

हे देव, दयालु कृपानिधि प्रभु,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥
तुम विष्णु, ब्रह्ममय, शिवस्वरूप ।
तुम ज्ञान - भक्ति - वैराग्य रूप ॥
निर्माल्य कीर्ति, श्री, यश शोभित
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ १ ॥
तुम काम - जयी, मद, मत्स - जयी ।
तुम क्रोध, लोभ पुनि मोह - जयी ॥
अनुपम सारल्य, घमंड - शून्य,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ २ ॥
तुम शुभ्र, ज्योत्सना-मय, निर्मल ।
तुम लीलामय अतिप्रिय - विठ्ठल ॥
जगती - जन - जन के पूज्यनीय,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ३ ॥
तुम आत्मलीन, निर्द्वन्द, सदा ।
तुम नित्य सत्चिदानन्द मुदा ॥
शरणागत के आश्रयदाता
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ४ ॥
तुम शुद्ध, शांत, निस्सीम, सरल ।
तुम आदि - अंत से परे निखिल ॥
अति क्लान्त दुखित के दुखत्राता,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ५ ॥
तुम पूर्ण मनस्वी, करुणामय ।
तुम प्रखर, शक्तिधर, महिमामय ॥
भक्तों के बुधि - विवेक - दाता,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ६ ॥
तुम योगीश्वर, महिमा मंडित ।
तुम वीतराग, निष्प्रह, पंडित ॥
भयभीत, निबल - जन के सम्बल,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ७ ॥
तुम भक्त - विमल - मति, पथदर्शक ।
तुम साधक, शुद्ध, सुगति - देयक ॥
अर्पित निर्मल - मन, प्रेम - प्रबल,
सद्गुरु समर्थ साई प्रणाम ॥ ८ ॥

—**बृजकिशोर दुबे**, जिल्हा अल्पबचत अधिकारी, होशंगाबाद (मध्य प्रदेश).

# श्रीसाई–प्रेम

साई नामाचे अमृत पिऊनी
अमर व्हा रे । अमर रहा
शिर्डीसी जाऊनी बाबा चरणी
सुगंध सुमने तुम्ही व्हा ॥ ध्रु. ॥

साईबाबांचे घेता दर्शन ।
जळती पापे होशी पावन ।
स्मरता ते येती धाऊन ।
प्रचिती घेऊनी तुम्ही पहा ॥ १ ॥

द्वारकामाईमधे साई असती ।
रंजले गांजले धावा करती ।
उदी देऊनी बाबा सांगती ।
मजवरी भार टाका, स्वस्थ रहा ॥ २ ॥

सर्व धर्मीय समान सारे ।
परमेश्वराचीच सर्व लेकरे ।
भेदभाव टाका सगळे ।
बाबा सांगती, आत्मा सर्वत्र तुम्ही पहा ॥ ३ ॥

—महादेव दत्तात्रय भिडे
११९५, चंद्रकिरण,
सदाशिव पेठ, पुणे ३०

57

# विडा

विडा घ्या हो साईराया – स्वामीनाथ हू तनया ॥ ध्रु ॥
सुशोभित पान दान – आली मधुरा घेवून—
पान देते करुनिया – चिदानंद साई राया ॥ विडा० ॥ १ ॥
निर्विकल्प केले मन – त्रयोदशी विडा आण
सामोरी मी धरिला – भक्तीभावे देते तुला ॥ विडा० ॥ २ ॥
पाव वेड्या भक्तीणीला – शिण नाही रे उरला
भाव पदी श्री जडला – तोडी रे मोहपाशाला ॥ विडा० ॥ ३ ॥

—सौ. माई आडकर
२४०५, श्रीसाईकृपा, आडवा रस्ता, बार्शी

---

# ॥ ॐ श्री साईनाथाय ॥

पुज्जाय साईनाथाय । सर्वधर्मरतायच
दिव्याय कल्पवृक्षाय । वंदे हम साईनाथवे
पुज्जाय साईनाथाय । सर्व रोग हरायच
दिव्याय वैद्यराजाय । वंदे हम साईनाथवे
पुज्जाय साईनाथाय । सर्व संकट हरायच
दिव्याय कष्टनाशाय । वंदे हम साईनाथवे
पुज्जाय साईनाथाय । सर्व दुःख निवारायच
दिव्याय दुःख हरताय । वंदे हम साईनाथवे
पुज्जाय साईनाथाय । संतती संपती दानायच
दिव्याय संपत्ती सुखदाताय । वंदे हम साईनाथवे
ये पठेत दिव्य स्तोत्राय । श्रद्धा भक्ति समनविता
तस्य श्री साईनाथाय । कृपा पात्र भवे ध्रुवम

—एन. आर. देशपांडे
मु. येल्लारेड्डी जि. निजामाबाद
(आंध्रप्रदेश).

५०

# श्रीसाईसेवाधाम–पिळगाव–गोवा

## रामनवमीचा अपूर्व सोहळा

गोव्यातील पिळगाव येथल्या श्रीसाईसेवाधाम या बाबांच्या मंदिरात यंदाचा रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाने व उत्साहाने दोन दिवस साजरा करण्यात आला. उत्सवाच्या पहिल्या दिवशी संस्थेचे आद्य संस्थापक श्री. पांडुरंग गणू शिरोडकर यांचे शुभ हस्ते श्रीसाईमूर्तीला अभिषेक करण्यात आला. दुपारी ह. भ. प. लाम्हणकर बुवा यांचे रामजन्मावर सुश्राव्य किर्तन झाले. श्री. गोविंद रामेश्वर सामनेरकर शास्त्री यांचे हस्ते श्रीरामास अभिषेक करण्यात आला. यानंतर पाळणा, आरती, नैवेद्य, प्रसाद इ. कार्यक्रम झाले. रात्री ११ वा. पालखीची गावातून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. तीत असंख्य भाविकांनी भाग घेतला. हा सुंदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत नरसिंह चणेकर अभिनंदनास पात्र आहेत.

---


श्रीसाईलीला खास गुरुपौर्णिमा अंक

# येत्या जुलैत थाटात प्रसिद्ध होत आहे

अंकातील विशेष आकर्षणे पुढील अंकी



ना० बी. जे. खताळ साहेब ( पाटील ) पाटबंधारे, कायदा व न्याय खाते मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते, शिर्डी येथील संस्थान नोकरांचे दुसऱ्या वसतीगृहाचे भूमिपूजन दि. १८-४-७६ रोजी झाले. शेजारी न्या. पारीखसाहेब दिसत आहेत

Regd. No. MH/BYE/26


## साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधू संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्‌गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील '**सोनियाचा दिस**' होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणूं काय "**आहले घराचे मंगल देऊळ** "

अशा नऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**

पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७

फोन नंबर : ५७६२९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्री ७ ते ९.


मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई ३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाटक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.

# श्री साईलीला



श्री बाबा दरदिवशी स्वत: माधुकरी मागत





D.D.NEROY

जून

६० पैसे

१९७६